# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दिनांक 12.01.2011 (का.प.क्र. 10) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.**

बुधवार दिनांक 12 जानेवारी 2011 (का.प.क्र.10) रोजी मा.सभापती,स्थायी समिती श्री.राजू रामराव शिंदे यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची स्थायी समितीची सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील मलीक अंबर स्थायी समिती सभागृह येथे दुपारी 12.15 वाजता वंदेमातरम् या गिताने सुरू झाली सभेला मा.आयुक्त,डॉ.पुरूषोत्तम भापकर,भा.प्र.से.,नगरसचिव श्री.एम.ए.पठाण यांचेसह संबधीत अधिकारी तसेच खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

01. स. श्री.सुर्यकांत सुभानराव जायभाये
02. स. श्री.विजय लक्ष्मणराव वाघचौरे
03. स. श्री.जगदीश कन्हैय्यालाल सिध्द
04. स. श्री.रेणुकादास (राजू) दत्तोपंत वैद्य
05. स. श्री.महेश शिवाजीराव माळवतकर
06. स. सौ.साधना गणेश सुरडकर
07. स. श्री.अमित सुधाकर भुईगळ
08. स. श्री.नासेरखॉन अब्दुल रहेमानखान
09. स. श्री.अब्दुल साजेद अ.सत्तार
10. स. श्री.मधुकर दामोधर सांवत
11. स. श्री.जुबेर गाझी असीर अहमद
12. स. श्री.प्रल्हाद गणपतराव निमंगावकर

**चर्चा :**

| | |
|---|---|
| मा.सभापती | :सर्वप्रथम विषय पत्रिका घेण्यात येईल. |
| श्री.रेणुकादास वैद्य | :विषय पत्रिकेस सुरुवात करण्यात यावी. |

**विषय क्र. 90 :**

दिनांक 25/10/2010 (का.प.क्र.8) व दिनांक 06/12/2010 (का.प.क्र.9) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद :**

| | |
|---|---|
| श्री.मधुकर सावंत | इतिवृत्त कायम करण्यापुर्वी मागील बैठकीत विचारण्यात आलेल्या निशांत मोटार्स बाबत काय कार्यवाही केली खुलासा करण्यात यावा. |
| मा.सभापती | :स.स.श्री.मधुकर सावंत यांच्या वार्डातील निशांत मोटार्स बाबत खुलासा करण्यात यावा. |
| प्रशासकीय अधिकारी | : निशांत मोटार्समध्ये सध्या मा.न्यायालयाची स्थगीती आदेश आहे. त्यामुळे काहीही कार्यवाही करता आली नाही. |
| श्री.मधुकर सावंत | :विधी विभागाचा खुलासा घेण्यात यावा. |
| विधी सल्लागार | :या प्रकरणांमध्ये मा.न्यायालयाने पुढील आदेशापर्यंत जैसे थे आदेश दिलेले आहे. |

| | |
|---|---|
| श्री.मधुकर सावंत | : say मध्ये काय दाखल केले त्याचा खुलासा करण्यात यावा. |
| विधी सल्लागार | : महानगरपालिकेचा जवाब दाखल झालेला आहे. अर्जावर मा.न्यायालय आदेश देतील. संचिका विभागातुन मागवुन खुलासा देण्यात येईल. |
| श्री.मधुकर सावंत | :वेळोवेळी सभागृहात हा विषय चर्चेला आलेला आहे. |
| विधी सल्लागार | :केस दाखल केलेली आहे. |
| श्री.मधुकर सावंत | : काय say दिला या बाबत माहिती देण्यात यावी. |
| मा.सभापती | :बांधकाम चालू होण्याआधी स.सदस्यांनी सांगीतले होते की, बांधकाम थांबविण्यात यावे किंवा पाडण्यात यावे परंतु बांधकाम पुर्ण झालेले आहे. संबधीतास कोर्टात जाण्याची संधी देखील दिलेली आहे. यास कोण जबाबदार आहे. |
| श्री.मधुकर सावंत | :इतिवृत्त थांबवुन बाकी विषय मंजूर करण्यात यावे. |
| श्री.अ.साजेद अ.सत्तार | :इतिवृत्ता संदर्भात एक प्रश्न विचारायचा आहे. |
| श्री.मधुकर सावंत | :वर्तमानपत्रात महानगरपालिकेची आर्थिक स्थिती बिघडलेली आहे. |
| श्री.अ.साजेद अ.सत्तार | :इतिवृत्तात पान क्रमांक 13 वर रोशनगेट येथील प्रकरणांत स.संचालक नगर रचना यांचा खुलासा करण्यात आलेला आहे. दिनांक 02.02.2009 पासून. |
| मा.सभापती | :न्यायालयीन प्रकरण असेल तर त्यावर सभागृहात चर्चा करता येणार नाही. हे प्रकरण दुसरे आहे काय? |
| श्री.अ.साजेद अ.सत्तार | :प्रकरण न्यायालयाने निकाली काढलेले आहे. विधी सल्लागार यांचेकडुन खुलासा घेण्यात यावा. सहा महिण्यांपुर्वी न्यायालयाने इमारत पाडण्याचे आदेश दिलेले आहे. त्यास सहा महिणे झालेले आहे. सहाय्यक संचालक नगर रचना व विधी सल्लागार यांचेकडून खुलासा घेण्यात यावा की, या प्रकरणांत दिनांक 22.06.2010 रोजी मा.न्यायालयाने बिल्डींग पाडण्याचे आदेश दिलेले आहे. न्यायालयाने आदेश दिलेले असतांना बिल्डींग पाडण्यात आलेली नाही. संबधीताने बोगस बांधकाम परवानगी तयार केली. स्थायी समितीने गुन्हा दाखल करा म्हणुन आदेशित केले होते परंतु अद्याप पर्यंत गुन्हा दाखल केलेला नाही. विधी सल्लागार आणि सहाय्यक संचालक नगर रचना यांचेकडुन अगोदर खुलासा घेण्यात यावा. मागील 15 महिण्यांपासून हे प्रकरण हाताळत आहे. सांगत आहे. संबधीताने महानगरपालिकेची खोटी बिल्डींग परमिशन दाखल केली. त्याबाबतचे पत्र सहाय्यक संचालक न.र. यांनी मला दिले. बांधकाम परवानगी मनपाने दिलेली नाही म्हणुन स्थायी समितीमध्ये खुलासा केला. गुन्हा दाखल करण्याचे प्रशासनाला आदेशित केले होते. चौकशी समिती गठीत केली होती. चौकशी समितीचे पुढे काय झाले. टेक्निकल विभागाचा अभिप्राय आलेला आहे की, मनपाच्या खुल्या जागेवर इमारत बांधलेली आहे. संबधीताने 3000 चौ. फुट चार मजली इमारत बांधुन अद्याप पर्यंत कार्यवाही झालेली नाही. विधी सल्लागार यांचेकडून खुलासा घेण्यात यावा की, या प्रकरणांत 22.06.2010 रोजी न्यायालयाने बिल्डींग पाडण्याचे आदेश दिलेले आहे. त्यानंतर सहाय्यक संचालक न.र.यांचेकडून खुलासा घेण्यात यावा. मा.आयुक्तांना 34 स्मरणपत्रे दिलेले आहे. काहीही झाले नाही 15 महिने झाले. |

खंडणीचा गुन्हा दाखल करण्याची प्रतिक्षा करीत असेल. अगोदर विधी सल्लागार यांचेकडून खुलासा घेण्यात यावा की, दिनांक 22.06.2010 रोजी न्यायालयाने बिल्डींग पाडण्याचे आदेश दिलेले आहे. तरी इमारत पाडण्यात आलेली नाही. टेक्निकल सेक्शनने अहवाल दिला आहे की, महापालिकेच्या खुल्या जागेवर संबधीताने 3000 चौ.फुट जागेवर इमारत बांधली.

मा.सभापती :मा.न्यायालयाने दिलेले आदेश सभागृहात विधी सल्लागार यांनी अवगत करावे.

विधी सल्लागार :दिनांक 22.06.2010 रोजी संबधीताने दाखल केलेले प्रकरण मा.न्यायालयाने खारिज केलेले आहे. त्यामुळे पुढील कार्यवाही करण्यास अडथळा नाही. अशी माहिती देण्यात आलेली आहे.

श्री.अ.साजेद अ.सत्तार :मा.न्यायालयाने आदेश दिल्यानंतर विधी विभागाने सदर पत्र तयार करून अतिक्रमण विभागास दिले. मा.न्यायालयाने प्रकरण खारीज केलेले आहे. पाडण्यास काही हरकत नाही. असे पत्र विधी विभागाकडून पाठविल्यावर अतिक्रमण विभागाकडून काय कार्यवाही झाली. त्यानंतर संबधीत थांबला नाही. मा.न्यायालयाचे आदेश झाल्यानंतर संबधीताने महानगरपालिकेची खोटी बांधकाम परवानगी घेतली. सदर परवानगी बाबत सहाय्यक संचालक नगर रचना यांना पत्र दिल्यानंतर मनपाने सदर बांधकाम परवानगी दिलेली नाही. त्यांनतर जुन मध्ये सभापती यांनी संबधीतावर गुन्हा दाखल करा म्हणून आदेश दिले. प्रशासनाने आजपर्यंत गुन्हा दाखल केलेला नाही. स.सदस्य श्री.मधुकर सावंत यांचे प्रकरणांतही कदाचित मा.न्यायालय आदेश देतील. पाडून टाका परंतु अधिकारी पाडणार नाही. त्यांच्या प्रकरणामध्ये मला बोलण्याचा हक्क आहे म्हणून मी सांगतो. त्यांनी हे प्रकरण पाच वेळा उचलले परंतु प्रशासनाने बिल्डींग तयार करण्यासाठी त्याला मोकळीक दिली. आता सांगण्यात येते की, मा.न्यायालयाचे आदेश आहे. मा.न्यायालयाने आदेश दिल्यानंतर, विधी विभागाने पत्र दिल्यानंतरसुध्दा बिल्डींग पाडण्यात आलेली नाही.

मा.सभापती :संबधीत विभागाकडुन काय कार्यवाही करण्यात आली. खुलासा करण्यात यावा.

श्री.अ.साजेद अ.सत्तार :ADTP यांचेकडून खुलासा घेण्यात यावा की, संबधीताने महानगरपालिकेकडून बांधकाम परवानगी घेतली नाही. महानगरपालिकेतील संबधीत विभागाचे श्री.शेख यांना हस्तक्षेप करून बोगस बांधकाम परवानगी दाखल केली. हे प्रकरण दाखविले त्यावेळी सर्व सदस्य गंभिर प्रकरण आहे म्हणून सर्वांनी सांगीतले परंतु श्री.डी.पी.कुलकर्णी साहेबांनी लेखी पत्र दिले की, बांधकाम परवानगी महानगरपालिकेने दिली नाही. त्यांचेकडून खुलासा घेण्यात यावा. संबधीताने बोगस बिल्डींग परवानगी तयार केली.

मा.सभापती :खुलासा करण्यांत यावा.

सहाय्यक संचालक न.र. :ज्या स्थायी समितीमध्ये ही चर्चा झाली होती. त्यावेळेस जी बिल्डींग परमिशन दाखवली होती. ती बिल्डींग परमिशन नगर रचना विभागाकडून देण्यात आली नव्हती. खोटी तयार केली होती. कशी तयार केली याची माहिती नाही.

| | |
|---|---|
| श्री.अ.साजेद अ.सत्तार | :ADTP यांनी खुलासा केलेला आहे की, खोटी बांधकाम परवानगी तयार केली होती. मा.न्यायालयाने आदेश दिला की, सदरची बिल्डींग पाडा प्रशासनाने पाडलेली नाही. न्यायालयाने आदेश दिल्यानंतर संबधीताने बोगस बिल्डींग परमिशन तयार केली. Declaration Deed Registered तयार केली. पाच मजली इमारत बांधण्यात आली. मा.सभापती यांनी आदेश दिले की, गुन्हा दाखल करा. ADTP यांचेकडून खुलासा घेण्यात यावा की, अतिक्रमण विभागास पत्र दिले आहे का की, मनपाच्या जागेवर इमारत बांधलेली आहे. माझ्याकडे नकाशा आहे. ADTP यांना नकाशा दिलेला आहे. मा.आयुक्तांनाही नकाशा दिलेला आहे. बोगस बांधकाम परवानगी आहे. |
| मा.सभापती | :बांधकाम परवाना महानगरपालिकेच्या नावांने बोगस असेल महानगरपालिकेचे नांव आहे सिंम्बॉल आहे. महानगरपालिकेचीही फसवणुक केलेली आहे. याप्रकरणी संबधीतावर गुन्हा दाखल करण्यास काय अडचण होती. गुन्हा दाखल करता येतो की, नाही विधी सल्लागार यांनी खुलासा करावा. महानगरपालिकेची फसवणुक आहे का? गुन्हा कोणत्याप्रकारे दाखल होतो. |
| विधी सल्लागार | :सदरील प्रकरणी संबधीताने खोटे दस्ताऐवज करून ADTP यांचे खोटी सही करून बिल्डींग परमिशनचे खोटे दस्ताऐवज तयार केले असल्यामुळे 420 आणि फोर्जरीचाही गुन्हा दाखल होतो. शिवाय मनपाची परमिशन न घेता बांधकाम केलेले आहे MRTP खाली गुन्हा दाखल होतो. |
| मा.सभापती | :कोणत्या विभागाकडून हे काम झालेले आहे. (ADTP) संबधीत विभाग प्रमुखाने तात्काळ गुन्हा दाखल करायला पाहिजे होता. विलंब केलेला आहे म्हणुन आपण शेवटची संधी म्हणून तात्काळ गुन्हा दाखल करणेसाठी मा.आयुक्तांची मंजूरी घेऊन गुन्हा दाखल करण्यात यावा. नसता पुढील बैठकीत आपणावर योग्य ती कार्यवाही करण्यांत येईल. |
| श्री.अ.साजेद अ.सत्तार | :ADTP यांचेकडून खुलासा आलेला आहे की, मनपाच्या खुल्या जागेवर बांधकाम केलेले आहे. मा.न्यायालयात संबधीत गेला होता. मा.न्यायालयात मनपाच्या वकीलांनी मनपाची बाजू मांडली त्यानुसार त्याचा स्टे व्हॅकेट केला. मा.न्यायालयाने दिनांक 22.06.2010 रोजी पत्र दिले स्टे खारीज केला आणि बिल्डींग तोडण्याची महानगरपालिकेला परवानगी दिली. त्यानंतर प्रकरण आपल्याकडे आहे. जुनमध्ये मा.सभापती यांनी आदेश दिले की, बिल्डींग पाडा. बिल्डींग पाडण्यास काय अडचण आहे. |
| मा.सभापती | :बिल्डींग पाडण्याचे मा.न्यायालयाचे आदेश आहे का? असेल तर आत्तापर्यंत का पाडण्यात आली नाही. खुलासा करण्यात यावा. |
| श्री.अ.साजेद अ.सत्तार | :जुनमध्ये मा.न्यायालयाने आदेश दिलेले आहे. त्यानंतर विधी विभागाने ते पत्र तयार करून अतिक्रमण विभागास दिलेले आहे. प्रकरण मा.न्यायालयाने हे आदेश खारीज केलेले आहे. बिल्डींग पाडा. |
| मा.सभापती | :तसे आदेश आहेत का आपल्याला. |
| प्रशासकीय अधिकारी | :संबधीत फाईल ही श्री.अन्वर खान यांचे ताब्यात आहे. पोलीस विभागाने ती |

त्यांच्यामार्फत संबधीतावर यापुर्वी प्रशासकीय विभागाने अनाधिकृत बांधकामाबाबत संबधीतावर गुन्हा दाखल केलेला आहे.

श्री.अ.साजेद अ.सत्तार :दोन वेगवेगळे गुन्हे दाखल केलेले आहे.

प्रशासकीय अधिकारी :कार्यवाही करणेसाठी बिल्डींग तोडण्यासाठी प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे. पोलीस विभागास चार ते पाच वेळेस पत्र देण्यात आलेले आहे. सदरील एरिया हे सेन्सेटीव्ह असल्याने तसेच त्या भागात 99 टक्के इमारती अनाधिकृत आहे. कारवाई करायची असेल तर सर्वांवर कार्यवाही करावी लागेल. उपआयुक्त श्री.जावळीकर यांचे सहीने पोलीस बंदोबस्तासाठी पत्र दिलेले आहे.

श्री.अ.साजेद अ.सत्तार :त्या ठिकाणी 99 टक्के बांधकाम अनाधिकृत असले तरी कोणतेही बांधकाम ही बिल्डींग बोगस परवानगी तयार केलेली नाही. कोणतीही इमारत पाडण्याचे आदेश कोर्टाने दिलेले नाही. या प्रकरणी दोन गंभीर बाब आहे. एकतर सर्वप्रथम ही मनपाची जागा आहे. श्री.झनझन यांनी पत्र दिले होते की, ही जागा खाजगी आहे. त्याचेविरूध्द काही कार्यवाही होणार नाही. कार्यवाहीची मागणीही करणार नाही. त्यांचेवर कार्यवाही करा की, मनपाची जागा ही खाजगी जागा असल्याचे पत्र दिलेले आहे.

मा.सभापती :संबधीत इमारत पाडण्याची मा.न्यायालयाची काही अडचण नसेल व तसे आदेश दिले असेल तर तात्काळ तीथे पोलीस फोर्स घेऊन बिल्डींग पाडून तसा रिपोर्ट पुढील बैठकीत सादर करावा नसता गंभीर स्वरूपाची कार्यवाही करण्यात येईल.

श्री.अ.साजेद अ.सत्तार :बोगस बिल्डींग परमिशन दाखल केली आहे.

मा.सभापती :गुन्हा दाखल करण्याचे सांगण्यात आले आहे.

श्री.अ.साजेद अ.सत्तार :केव्हा होणार.

मा.सभापती :पुढील बैठकीपर्यंत नाही झाल्यास त्यांचेवर कार्यवाही करू.

सभा तहकूब दूपारी 12.35 वाजता.

सभा सुरू दूपारी 12.45 वाजता.

नगर सचिव : पान क्र.35 विषय क्र.86 मध्ये दुरूस्ती.

मा.सभापती : विषय क्र.90 दुरूस्तीसह मंजूर. इतिवृत्तातील पान क्रमांक 35 विषय क्रमांक 86 मध्ये दुरूस्ती आहे. दुरूस्तीसह मंजूर.

**ठराव :**

दिनांक 6/12/2010 रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभा (का.प.क्र.09) च्या इतिवृत्तातील पृष्ठ क्र.35 वर विषय क्रमांक 86 मधील ठरावात "जयभवानी नगर येथील नाल्यातील गाळ काढून खोली वाढविणे बाबतच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारक मे.अरबाज कन्स्ट्रक्शन यांची 21.86% कमी दराची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते."या दुरूस्तीसह दिनांक 25/10/2010(का.प.क्र.8) व दिनांक 06/12/2010 (का.प.क्र.9) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

**विषय क्र. 91 :**

मा.आयुक्त महोदय, यांचे मान्यतेने उपआयुक्त (सिडको), महानगरपालिका औरंगाबाद हे प्रस्ताव सादर करीत आहे की, महानगरपालिकेच्या मालकीच्या चिकलठाणा येथील आठवडी बाजार शुल्क वसुली

सन 2010-2011 साठी तीन वेळा जाहीर निविदा प्रसिध्द करून देखील योग्य प्रतिसाद न मिळाल्याने प्रकरणात खालीलप्रमाणे शुल्क वसुली संदर्भाने दोन अर्ज प्राप्त झाले होते. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

01. श्री.मिर्झा सलीम बेग रा.कबाडीपुरा औरंगाबाद रू.7500/- प्रति बाजार प्रमाणे

02. श्री.मोहन यादवराव दाभाडे रा.गांधीनगर,औरंगाबाद रू.6600/- प्रति बाजार प्रमाणे

वरीलप्रमाणे असून मा.आयुक्त महोदय यांचे मान्यतेने संबंधीतास वाटाघाटीस दि.19/11/2010 रोजी बोलावले असता, श्री.मिर्झा सलिम बेग हे अनुपस्थित असून श्री.मोहन दाभाडे यांचेतर्फे श्री.ताराचंद मोहन दाभाडे यांनी हजर राहून प्रतिबाजार रू.7611/- प्रमाणे वसूली करण्यास लेखी संमती दर्शविली होती त्यात पुन्हा कार्यालयातर्फे रू.7700/- इतकी वाढ करण्यात आली असून संबंधीताने रू.7700/- प्रति बाजार प्रमाणे वसुली करण्यास होकार दिला आहे.

करीता चिकलठाणा येथील आठवडी बाजार (शुक्रवार) शुल्क वसुली संदर्भाने श्री.ताराचंद मोहनराव दाभाडे यांचे नांवाने सन 2010-2011 साठीचा ठेका रक्कम रू.7700/- प्रति बाजार प्रमाणे देणे योग्य राहील.

प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

मा.सभापती : फेरनिविदा करण्यांत यावे.

**<u>ठराव :</u>**

सभागृहात झालेल्या चर्चेुसार महाागरपालिकेच्या मालकीच्या चिकलठाणा येथील आठवडी बाजार शुल्क वसुली करीता फेरनिविदा काढावी असे सर्वानुमते ठरले.

**<u>विषय क्र. 92 :</u>**

मा.आयुक्त महानगरपालिका, औरंगाबाद यांचे मान्यतेनुसार उप आयुक्त (सिडको), महानगरपालिका, औरंगाबाद हे प्रस्ताव सादर करीत आहे की, औरंगाबाद महानगरपालिकेच्या मालकीच्या सिडको नाट्यगृह येथील उपहारगृह (कॅन्टीन) भाडे तत्वावर चालविण्यासाठी जाहीर निविदा मागविण्यात आल्या असता एकूण दोन निविदा प्राप्त झाला त्याचा तपशिल खालील प्रमाणे.

| अ.क्र. | निविदाधारकाचे नांव | अपेक्षित दर प्र.म. | प्राप्त दर प्र.म. | शेरा |
|---|---|---|---|---|
| 01. | श्री.रूमाले अशोक रामभाऊ, एन-5 सिडको, औरंगाबाद | 5000/- | 21,000/- | प्रती माह |
| 02. | श्री.शंकर तुकाराम वाघ, एन-5 सिडको, औरंगाबाद | 5000/- | 12,050/- | प्रती माह |

याप्रमाणे एकूण दोन निविदा प्राप्त झाल्या असून सर्वात जास्तीची निविदा श्री.रूमाले अशोक रामभाऊ यांची रक्कम रू.21,000/- प्रतीमाह प्रमाणे असल्याने संबंधीतास सन 2010-11 साठी सिडको नाट्यगृह येथील उपहारगृह चालविण्यास देणे योग्य राहील. करिता प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**<u>संवाद :</u>**

श्री.रेणुकादास वैद्य :सर्वसाधारण सभेमध्ये सिडको नाटयगृहाचे खाजगीकरण करण्याचा प्रस्ताव मंजूर केला असतांना अशा पध्दतीने कॅन्टीन कशासाठी देत आहोत. खुलासा करण्यात यावा.

मा.सभापती :खुलासा करण्यांत यावा.

उपआयुक्त (सिडको) :सिडको नाटयगृहाचा विषय ज्या सभेमध्ये मंजूर झाला त्यापुर्वी हया निवीदा केलेल्या आहे.

श्री.रेणुकादास वैद्य :सिडको नाटयगृहाचे खाजगीकरण करणार आहोत की नाही. करणार असेल तर या विषयास मंजूरी देणे संयुक्तिक आहे का?

उपआयुक्त (सिडको) :तोपर्यंत जास्तीच्या निवीदा ठेकेदार पाच हजार रूपये देतो. आज आपल्याला 21000 रूपयांनी निवीदा करतो. जोपर्यंत खाजगीकरणाचा प्रस्ताव मंजूर होत नाही. तोपर्यंत देण्यास काही हरकत नाही.

श्री.रेणुकादास वैद्य :खाजगीकरणाचा निर्णय घेतल्यावर पुन्हा तुकडया तुकडयामध्ये टेंडर काढले तर सिडको नाटयगृहाच्या खाजगीकरणासाठी कुणी निवीदाधारक येईल का? याचा विचार केला जातो की नाही.

उपआयुक्त (सिडको) :जे टेंडर केले ते मार्चपर्यंत खाजगीकरण जेव्हा होईल त्यानंतर पुन्हा करता येईल.

श्री.रेणुकादास वैद्य :ई टेंडर करत असतांना संबधीतावर अटी टाकण्यात यावे. ज्यावेळी सिडको नाटयगृहाचे खाजगीकरण होईल त्या दिवसापर्यंतच ॲग्रीमेंट करण्यात यावे.

मा.सभापती : दुरूस्तीसह मंजूर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद महानगरपालिकेच्या मालकीच्या सिडको नाट्यगृह येथील उपहारगृह (कॅन्टीन) भाडे तत्वावर चालविण्यासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी सर्वात जास्त दराचे निविदाधारक श्री.रूमाले अशोक रामभाऊ यांची रक्कम रू.21,000/- प्रती माह प्रमाणे असल्याने संबंधीतास सन 2010-11 साठी सिडको नाट्यगृह येथील उपहारगृह चालविण्यास देणेकरीता सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

तसेच सभागृहात झालेल्या चर्चेनुसार सिडको नाटयगृहाचे खाजगीकरण होईल त्या दिवसापर्यंतच ॲग्रीमेंट करण्यात यावे. असे सर्वानुमते ठरले. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. 93 :</u>**

मा.कार्यकारी अभियंता, (वॉर्ड- ई व फ) महानगरपालिका, औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला की, वॉर्ड क्र.81 अंतर्गत जयभवानीनगर स.नं.68 येथे 150 व 200 मि.मी. व्यासाची डी.आय.के.-7 जलवाहीनी टाकण्याचे प्रस्तावित आहे. त्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाची सन 2009-10 च्या दरसुचीनुसार रक्कम रू.9,14,050/- एवढ्याचे अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे. या कामाचा खर्च गुंठेवारी विकास या लेखाशिर्ष मधुन करण्यात येणार आहे. सदरील अंदाजपत्रकास मा.आयुक्त महोदय यांची मान्यता झालेली आहे. सदरील कामासाठी ई निविदेद्वारे जा.क्र./बी-163/2010 दिनांक 16/10/2010 अन्वये निविदा मागविण्यात आल्या असता निविदा स्विकारण्याच्या अंतीम तारखेपर्यंत एक निविदा प्राप्त झाली ती खालीलप्रमाणे आहे.

1. श्री.व्ही.एस.देशमुख- 35.35 जास्त.

वरील प्राप्त एकमेव निविदा श्री.व्ही.एस.देशमुख यांची निविदा 35.35 % जास्त दराची असल्यामूळे व सद्याच्या बाजार भावानुसार तुलना केल्याप्रमाणे गुत्तेदारासोबत दर कमी करणे बाबत वाटाघाटीअंती 21.788% जास्त दर मान्य करण्यात आलेले आहे.

सदरील 21.788 जास्त दराची निविदेमुळे आता होणारा खर्च रक्कम रूपये 10,63,312/- इतके जास्त होणार असल्याने वाढीव खर्चासह श्री.व्ही.एस.देशमुख यांची वाटाघाटीअंती ठरलेल्या 21.788% जास्त या दराने निविदा मंजुरीस्तव प्रस्ताव सादर.

मा.सभापती : विषय क्रमांक 93 मंजूर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.81 अंतर्गत जयभवानीनगर स.नं.68 येथे 150 व 200 मि.मी. व्यासाची डी.आय.के.-7 जलवाहीनी टाकण्याचे कामासाठी प्राप्त झालेल्या जास्त दराच्या

निविदाधारकाशी झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्यानुसार सदरील काम अं.प.दरापेक्षा 21.788% जास्त दरानुसार त्यासाठी लागणाऱ्या वाढीव खर्चासह निविदाधारक श्री.व्ही.एस.देशमुख यांचेकडून करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 94 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, हर्सुल पिसादेवी येथे जलनि:सारण वाहीनी टाकणे व सिवेज पंपींग स्टेशन बांधणे करीता रक्कम रू.49,04,544/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून त्यास मा.सर्वसाधारण सभेने ठराव क्र.857 दिनांक 21/12/2009 अन्वये मान्यता दिलेली आहे. सदरील कामाचा खर्च सन 2008-09 या आर्थिक वर्षाअंतर्गत 12 व्या वित्त आयोगातून प्राप्त निधी अन्वये करण्यात येईल.

सदरील कामास्तव ई निविदा विभागामार्फत निविदा मागविण्यात आल्या असता उदय इंजिनिअरींग वर्कस् यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा 18.99 % जास्त दराची एक निविदा दर भरून प्राप्त झालेली आहे. तथापी अंदाजपत्रकीय दरापेक्षा 18.99 % जास्त दरा ऐवजी अंदाजपत्रकीय दरापेक्षा 17.99 % या दराने मान्यतेस्तव मा.स्थायी समितीकडे पाठविणे बाबत मा.आयुक्त महोदय यांनी शिफारस केलेली आहे.

त्यानुसार उदय इंजिनिअरींग वर्कस् यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा 18.99 % जास्त दरा ऐवजी अंदाजपत्रकीय दरापेक्षा 17.99 % जास्त दराचा निविदा प्रस्ताव मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**संवाद :**

श्री.रेणुकादास वैद्य :काम होण्यास आमची काही हरकत नाही परंतु पंपीग स्टेशनसाठी त्या ठिकाणी जागा आहे का? या संदर्भात खुलासा होणे अपेक्षित आहे.

उपअभियंता (श्री.सिद्दीकी) :विषया संदर्भात सध्या पंपीग स्टेशनकरीता जागा उपलब्ध नाही. जागा अधिगृहीत करणेबाबतचा प्रस्ताव रितसर टाऊन प्लॅनिंग विभागाला पाठविण्यात आलेले आहे. तसेच त्या जागेतील खाजगी लॅन्डलॉर्डस्शी संबधीत स.सदस्यांची मदत घेऊन जागा देणेबाबत वारंवार विनंती करत आहे. कारण पिसादेवी येथील ड्रेनेज लाईनची अवस्था बिकट झालेली आहे.

श्री.रेणुकादास वैद्य :ड्रेनेज लाईन टाकणे आवश्यक आहे. सिवर लाईन टाकणे हे आवश्यक आहे हे मान्य आहे परंतु त्यासाठी सर्वप्रथम जागेची आवश्यकता आहे. जागाच उपलब्ध नसतांना काम कसे होईल. जागेची पुर्तता करणे आवश्यक आहे. तेथील नागरीक जागा देण्यासाठी तयार आहे का.

उपअभियंता :तीन नागरीकांशी बोलणी सुरू आहे.

श्री.रेणुकादास वैद्य :जागा नसतांना अशा पध्दतीने प्रस्ताव कसे करतात. टेंडर काढण्यापुर्वी जागा बघणे आवश्यक आहे.

उपअभियंता :हया अटीच्या अधिन राहूनच विभागाने टेंडर काढलेले आहे.

श्री.रेणुकादास वैद्य :एवढी घाई कशासाठी जागा नसतांना टेंडर कॉल करतात.

उपअभियंता :सदरील काम 12 व्या वित्त आयोगातुन होते. वेळेवर काम होणे आवश्यक आहे.

श्री.रेणुकादास वैद्य :जागाच नसेल तर काम कसे होईल.

उपअभियंता :जागा अधिगृहीत करणे संदर्भात टाऊन प्लॅनिंगला विनंती केलेली आहे. व्यक्तीगत रित्या लॅन्ड लॉर्डस्शी बोलणी सुरू आहे.

श्री.रेणुकादास वैद्य :विषयास विरोध नाही. कार्यपध्दतीस विरोध आहे. जागा नसतांना टेंडर कॉल केले यास काही अर्थ नाही. जागा नाही आणि टेंडर मंजूर करून काम होणार नाही नागरीकांचे प्रश्न तशास तशे राहतील.

मा.सभापती :जागेबाबत पहाणी करावी. जागा देणेसाठी कुणी प्रशासनाकडे आलेले आहे का?

उपअभियंता :प्रत्यक्ष व्यक्तीगतरित्या लोकांना बोलावुन जागा देणेसाठी विनंती केली जात आहे.

मा.सभापती : सर्वप्रथम जागेचे नियोजन करण्यात यावे. 12 व्या वित्त आयोगाचा हा जो निधी आहे तो दुसऱ्या ठिकाणी वापरण्यात यावा. जागा उपलब्ध जेव्हा होईल तेव्हा 13 व्या वित्त आयोगातून काम करण्यात यावे.

कृषी उत्पन्न बाजार समितीची ड्रेनेज लाईन पुर्ण फुटलेली आहे. शेतकऱ्यांच्या दहा ते पंधरा तक्रारी आलेल्या आहेत. ती ताबडतोब दुरूस्त करण्यात येवुन याबाबतची माहिती देण्यात यावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, हर्सुल पिसादेवी येथे जलनिःसारण वाहीनी टाकणे व सिवेज पंपींग स्टेशन बांधणे या कामाकरीता प्राप्त झालेल्या तुलनात्मकदृष्ट्या अंदाजपत्रकीय दरापेक्षा 18.99 % जास्त दरा ऐवजी अंदाजपत्रकीय दरापेक्षा 17.99 % जास्त दराने उदय इंजिनिअरींग वर्कस् यांचेकडून सदरील काम करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. तसेच सर्वप्रथम जागेचे नियोजन करण्यात यावे असे सर्वानुमते ठरले. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 95 :**

मा.कार्यकारी अभियंता, (वॉर्ड ई व फ) महानगरपालिका, औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला की, वॉर्ड क्र.80 अंतर्गत नागरी दलीत वस्ती सुधारणा योजने अंतर्गत 100, 150 व 200 मि.मी. व्यासाची डी.आय.के-7 जलवाहीनी टाकण्याचे प्रस्तावीत आहे. त्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाची सन 2009-10 च्या दरसुची नुसार रक्कम रू.25,00,000/- एवढ्याचे अंदाजपत्रक तयार करण्यात येवून त्यास मा.सर्वसाधारण सभेमध्ये दिनांक 15/12/2006 ठराव क्रमांक 616 नुसार मान्यता प्राप्त आहे. या कामाचा खर्च नागरी दलित वस्ती सुधारणा योजना निधी या लेखाशिर्ष मधुन करण्यात येणार आहे. सदरील अंदाजपत्रकास मा.आयुक्त महोदय यांची मान्यता झालेली आहे. सदरील कामासाठी ई निविदेद्वारे जा.क्र./बी-208/2010 दिनांक 30/11/2010 अन्वये निविदा मागविण्यात आल्या असता निविदा स्विकारण्याच्या अंतिम तारखेपर्यंत तीन निविदा प्राप्त झाल्या त्या खालील प्रमाणे आहे.

1. मे.उदय इंजिनिअरींग वर्क्स - 18.18% जास्त.
2. मे.नुर कन्स्ट्रक्शन - 20% जास्त.
3. श्री.एस.बी.साधवाणी - 39.5 % जास्त.

वरील प्राप्त निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराची निविदा ही मे.उदय इंजिनिअरींग वर्क्स 18.18% जास्त दराची असल्यामूळे या दराने निविदा मंजुरीस्तव प्रस्ताव सादर.

**संवाद :**

श्री..अ.साजेद अ.सत्तार :मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती :मंजूर.

श्री.विजय वाघचौरे :वॉटर सल्पायच्या संचिका मंजूर होत नाही. वॉटर सप्लायची कामे होत नाही. समांतर जलवाहीनीचा विषय सांगण्यात येतो.

| | |
|---|---|
| श्री.रेणुकादास वैद्य | :समांतर जलवाहिनीसाठी चार वर्ष लागत असेल व वॉटर सप्लायचे कामे थांबविलेले ते करण्यात यावे. |
| श्री.महेश माळवतकर | :एखाद्या भागात दूषित पाणी येत असेल तर दुरूस्ती होणार आहे की नाही. |
| श्री.विजय वाघचौरे | :प्रत्येक वेळेस समांतरचा विषय सांगण्यात येतो. तीन वर्ष दुषित पाणी प्यायचे काय? |
| श्री.प्रल्हाद निमगांवकर | :माझ्या वार्डातील हे दुषित पाणी आहे (यावेळी पाण्याने भरलेली बाटली दाखवतात) ते पिण्यास कितपत योग्य आहे. प्रशासनास वारंवार सदरील समस्येबाबत सांगण्यात आले परंतु काहीही झालेले नाही. |
| श्री.विजय वाघचौरे | :वॉटर सप्लायचे टेंडरचे कामे काढलेले आहे ते कामे होणार आहे किंवा नाही. |
| श्री.रेणुकादास वैद्य | :समांतर जलवाहिनीची योजना आपल्या कार्यकाळात पुर्ण होईल अशी आमची अपेक्षा आहे. एकंदरीत महानगरपालिकेची परिस्थिती पहाता होईल किंवा नाही याबाबतीत आमच्या मनात शंका निर्माण होणार आहे. माझी विनंती आहे की, समांतर जलवाहिनी होईल तेव्हा होईल ज्या ठिकाणी गरज आहे तातडी आहे. ते कामे थांबविण्यात येवु नये. समांतर जलवाहीनीचा बेसिक डाटा मनपाकडे तयार आहे त्यापध्दतीने नियोजन करून जलवाहिण्या टाकण्यात याव्या. त्याचा उपयोग भविष्यात समांतर जलवाहिनीत होईल. |
| श्री.प्रल्हाद निमगांवकर | :सदर दुषित पाण्याविषयी खुलासा करण्यात यावा. |
| श्री.विजय वाघचौरे | :पाणी पुरवठा अधिकाऱ्यांच्या वारंवार बदल्या होत आहे. प्रत्येक इंजिनिअर त्या ठिकाणी जागेवर आहे काय? बदलीचा खुलासा करण्यात यावा. |
| श्री.रेणुकादास वैद्य | :बदल्या करणे ना करणे हा मा.आयुक्तांचा अधिकार आहे. विनंती आहे की, ज्या बदल्या करण्यात येतात त्याची माहिती संबधीत स.सदस्यांना होणे गरजेचे आहे. |
| श्री.महेश माळवतकर | :विभाग प्रमुखांच्या बदल्या करण्यात आल्या आज 25 दिवस झाले तरीही कामे होत नाही. बदल्याबाबत माहिती आजपर्यंत सदस्यांना मिळालेली नाही. आदेश काढुन 25 दिवस झालेले आहे. |
| मा.सभापती | :संबधीत खाते अधिकाऱ्यांकडे किती दिवस राहणार तेही सांगण्यात यावे. स.सदस्यांच्या ज्या भावना आहेत की, जे अधिकारी त्यांचे प्रभागात दिलेले आहे. ज्या अधिकाऱ्यांच्या बदल्या झालेल्या आहेत त्यांचे चार्ज विषयी स.सदस्यांना कळविण्यांत यावे. अधिकाऱ्यांकडे किती दिवस चार्ज राहणार आहे कळविण्यांत यावे. |
| उपअभियंता (ड्रेनेज) | :जे पाणी दुषित आलेले आहे. कुठल्या भागातुन आलेले आहे त्याची पाहणी करण्यात येईल. |
| मा.सभापती | :कोणते अधिकारी कोणत्या विभागात आहे याची माहिती देण्यात यावी. वार्ड वाईज करण्यात आले की, स्वतंत्र देण्यात आले खुलासा करण्यात यावा. |
| श्री.प्रल्हाद निमगांवकर | :संबधीत अधिकारी यांना माहिती आहे की, दुषित पाणी कुठले आहे. मागील बैठकीत दुरूस्त करण्याचे आदेश देण्यात आले होते. परंतु अद्यापपर्यंत काहीही झालेले नाही. |
| शहर अभियंता | :नविन विभाग रचनेनुसार पुर्ण पाणी पुरवठयाचा विभाग श्री.एस.डी.पानझडे यांचेकडे दिलेला आहे. आज ते कामानिमित्त बाहेरगावी गेलेले आहे. |

स.सदस्याची जी तक्रार आहे त्याचे निराकरण करण्यात येईल.

मा.सभापती :पुर्वीच्या बैठकीत प्रश्न मांडला होता त्यानंतर काय कार्यवाही केली हे सांगायला पाहिजे होते.

श्री.रेणुकादास वैद्य :आर्डर आज काढण्यांत आल्या त्यापुर्वीच्या अधिकाऱ्यांची जबाबदारी नव्हती काय? शहर अभियंता यांना जबाबदार धरायचे का खालच्या अधिकाऱ्यांनी लक्ष द्यायला हवे.

मा.सभापती :संबधीत अधिकारी यांना निर्देश देण्यात यावे की, स.सदस्य श्री.प्रल्हाद निमगांवकर यांचे वार्डातील दुषित पाणीपुरवठा करणारी पाईपलाईनचे काम ताबडतोब चालू करून सदरची समस्या तातडीने सोडविण्यात यावा .

शहर अभियंता :स्थळ पहाणी करून लगेच कामाला सुरूवात करण्यांत येईल.

श्री.अमित भुईगळ :ड्रेनेजच्या संचिका ठेवुन घेतल्या.

श्री.महेश माळवतकर :कलम 67 (क) खाली पेव्हरब्लॉक बसविण्यात येतात. सदरचे दुषित पाणी पिल्यानंतर नागरीकांच्या जिवीतास धोका होईल.

श्री.नासेर खान :सदरील प्रश्न हा एका वार्डापुरता मर्यादित नाही तर सगळयाच वार्डात ही समस्या आहे. दर आठ दिवसांत अधिकारी यांचे बदल्या करण्यात येतात. सहा महिण्यापुर्वी वार्डातील जलवाहीनीवरील वॉलचे काम झाले नाही. आज सांगण्यात येते की, मनपाची आर्थिक परिस्थिती बरोबर नाही. परंतु दोन दोन कोटी रूपयांची कामे केली जातात. पाच ते दहा हजारांची कामे करण्यास पैसे नाही. परंतु डांबरीकरणाचे दोन दोन कोटी रूपयांचे बिल अदा कसे केले जाते. हे अर्जेन्टली काम नाही. सादीया टॉकीज येथील पार्कीगमध्ये गट्टू बसविण्यात आले. त्यात आमचे वार्डाचे काम झाले असते.

श्री.महेश माळवतकर :पेव्हरब्लॉक जे बसविण्यात आले त्याची आत्ताची स्थिती वाईट आहे.

श्री.नासेर खान :बजेटमध्ये आम्ही जे कामे टाकलेली आहे. त्यातील एकही काम मंजूर नाही. आमचे वार्डातील कामे हे तात्काळ स्वरूपाचे आहे. पाण्याची, ड्रेनेजची समस्या सोडविण्यात यावी नसता आजची सभा स्थगीत करावी.

मा.सभापती :वेगवेगळया विभाग प्रमुखांच्या बदल्या केलेल्या आहेत ते किती दिवस राहणार आहे खुलासा करण्यांत यावा.

शहर अभियंता :विभागाची सध्या जी रचना केलेली आहे. ही खऱ्या अर्थाने महानगरपालिकेच्या कार्यपध्दतीची रचना आहे. 20 वर्षापासून याच प्रकारे काम होत होते. एका विभागाचा जर विभाग प्रमुख असेल तर काम पहाण्याची दर्जा राखण्याची कामे तत्परतेने करण्याची माहिती असते. तीन प्रकारच्या जबाबदाऱ्या असल्यास कुठले कामे होतात कुठले नाही. याची कल्पना येत नाही. ही जी रचना केलेली आहे ती पुढे चालू रहावी अशी माझी अपेक्षा आहे.

मा.सभापती :किती दिवस राहील हे सभागृहास सांगण्यात यावे.

शहर अभियंता :नेहमीसाठी चालू रहावी असे माझे मत आहे.

श्री.विजय वाघचौरे :मा.आयुक्त साहेबांनी खुलासा करावा.

श्री.महेश माळवतकर :मा.आयुक्त साहेबांनी खुलासा करावा.

मा.आयुक्त :वर्षानुवर्ष येथील जी रचना केली होती. तत्कालिन आयुक्तांच्या काळात दोन

दोन वार्डाचे काम देण्यात आले होते. दोन वार्डसाठी एक कार्यकारी अभियंता सर्व कामे पहात होते. गेल्या वर्षापासून वेगवेगळया तक्रारी आल्यात निवेदने आलेत. इंजिनिअर यांचे म्हणने होते खालपासून ते वरपर्यंत एकच अधिकारी असला पाहिजे. खाली जर एखादा जे.ई रोडचे काम करणारा असेल तर त्याचा उपअभियंता कार्यकारी अभियंता रोडचे काम पहाणारा असला पाहिजे. त्यांचे मत विचारात घेऊन, वेगवेगळे निवेदने हया सगळया गोष्टी पाहून तिनही कार्यकारी अभियंता यांनी एकत्र बसुन समस्या कमी करण्यासाठी कस स्ट्रक्चर असले पाहीजे. हे काम यांचेवर सोपविण्यात आले. खालपासून ते वरपर्यंतची रचना कशी असली पाहीजे हया शिफारशी तुम्ही सांगीतल्या पाहीजे. त्याप्रमाणे करण्यात येईल त्याप्रमाणे तीन्ही कार्यकारी अभियंता यांच्या बैठकाप्रमाणे हे ठरविण्यात आले. टेक्नीकली जे सूचविण्यात आले. जे.ई, उपअभियंता कार्यकारी अभियंता त्याप्रमाणे आखणी केली आहे. मलाही हेच वाटते की, पुन्हा पुन्हा बदल करण्याची गरज नाही. जे आपण आता केले आहे ते आता असेच राहणार आहे.

मा.सभापती :किती दिवस राहणार आहे.

मा.आयुक्त :मी जो पर्यंत आहे तोपर्यंत राहील.

मा.सभापती : श्री.निमगांवकर यांचे वार्डातील काम ताबडतोब सुरू करण्यात यावे. तसेच श्री.नासेर खान यांचे वार्डातील समता नगर येथील जलवाहीनीवरील व्हॉल्व दुरूस्त करण्यात यावा.

श्री.अमित भुईगळ :दिनांक 17.12.2010 रोजी नगर रचना विभागास नागपाल ग्रुप च्या कामाबाबत माहितीसाठी पत्र दिले आहे परंतु आजपर्यंत उत्तर मिळालेले नाही. माहितीच्या अधिकारात पत्र दिलेले आहे. 15 दिवस पुर्ण होत आहे. माहिती देण्यात आलेली नाही खुलासा करण्यात यावा.

सहाय्यक संचालक न.र :स.सदस्य यांनी मागीतलेली संचिका आयुक्त कार्यालयात चौकशीसाठी असल्यामुळे माझ्याकडे नाही. संचिका प्राप्त करून लगेच माहिती देण्यात येईल.

मा.सभापती :यापुर्वी माहितीची मागणी केली होती त्यावेळेस माहिती का देण्यात आली नाही.

सहाय्यक संचालक न.र. :माहितीच्या अधिकारातील पत्र कालच मला मिळालेले आहे.

मा.सभापती :जर नगरसेवकांना माहितीच्या अधिकारान्वये माहिती मागत असेल तर ते योग्य नाही.

सहाय्यक संचालक न.र. :पुर्वीच्या पत्राप्रमाणे माहिती देण्यात आलेली आहे . त्यांना अजुन माहिती अपेक्षित असेल तर ती देण्यात येईल.

मा.सभापती :स.सदस्यांनी मागीतलेली माहिती तात्काळ देण्यात यावी. पाणीपुरवठयाचे जे अत्यावश्यक कामे आहे. तिथे करण्यास हरकत नाही. समांतर ज्यावेळेस होईल त्यातुन वजा करण्यात यावे. विषय क्र.95 मंजूर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,वॉर्डक्र.80 अंतर्गत नागरी दलीत वस्ती सुधारणा योजने अंतर्गत 100, 150 व 200 मिमी व्यासाची डी.आय.के-7 जलवाहीनी टाकण्याचे कामासाठी प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारक मे.उदय इंजिनिअरींग वर्क्स यांची अं.प. दरापेक्षा 18.18% जास्त दराची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 96 :**

मा.आयुक्त महोदय, महानगरपालिका, औरंगाबाद यांचे मंजुरीनुसार उपआयुक्त (सिडको), महानगरपालिका, औरंगाबाद हे प्रस्ताव सादर करीत आहे की, अध्यक्ष, कबीरबाग मठ संस्था / नवजीवन सेवाभावी संस्था, गुलमोहर कॉलनी यांनी त्यांच्या संस्थेस एन-5 सिडको येथील महानगरपालिकेच्या मालकीचे सभागृह भाडेपट्ट्याने देणे बाबत विनंती अर्ज केला आहे.

त्यानुसार सदरील सभागृहाचे क्षेत्रफळ 85.4 चौ.मी. साठी सिध्द शिघ्र गणकानुसार प्रती चौ.मी. प्रती महा रू.114/- मासिक भाड्याच्या बारापट अनामत रक्कम, सेवा शुल्क, अकृषीक कराचा एक वर्षाचा आगाऊ भरणा करून घेऊन व मालमत्ता कर आकारून महानगरपालिकेच्या हक्कात भाडेपट्टा करारनामा योग्य. करीता प्रस्ताव मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**संवाद :**

श्री.रेणुकादास वैद्य :शहरामधील जे काही सभागृह, नागरी संस्था मागतात त्यांना त्वरीत देण्याच्या दृष्टीने प्रयत्न व्हावेत. शहरातील सभागृहांची अवस्था वाईट होत चालली आहे. ज्या संस्था मागणी करत आहे त्यांना कमीत कमी चार्ज आकारून कमीत कमी ती प्रॉपर्टी मेंन्टेंन राहील व मनपाच्या ताब्यात राहील. अशा प्रकारचे प्रस्ताव त्वरीत सबमिट करायला सांगावे.

श्री.मधुकर सावंत :विठ्ठल नगर एन-2 येथील हॉल मिळणे बाबत तानाई बहुउद्देशिय संस्थेने अर्ज सादर केलेला आहे. त्यांनाही देण्यात यावे.

सौ.साधना सुरडकर :माझ्या वार्डातील हॉल भाडयाने देणेबाबत गेल्या 2 ते 3 महिण्यांपासून पत्र दिलेले आहे.

मा.सभापती :भाडे समितीचा निर्णय असल्यामुळे थांबले होते. हया सभागृहांची अत्यंत वाईट अवस्था होती. एक ते दोन सभागृहांची पहाणी केली. तर अनेक कामांसाठी त्याचा उपयोग होऊ लागलेला आहे. सभागृहाचे दारे,खिडक्या सर्व काढुन नेलेले आहे. त्याकरीता जे जे सभागृह स.सदस्यांनी किंवा संस्थेने

श्री.रेणुकादास वैद्य :या संदर्भात सर्वसाधारण सभेने आणि स्थायी समितीने एक नियम ठरवुन घेतलेला आहे. 1000 रूपये भाडे आणि त्याचेवरील मेंन्टेनन्स जे काही असेल ते संबधीताने करावे. तेव्हा भाडे समितीचा विषय कुठे येतो. स्थायी समितीसमोर ठेवा स्थायी समिती त्यास मंजूर देईल.

श्री.मधुकर सावंत :पन्नालाल नगर येथील हॉल अतिशय वाईट अवस्थेत आहे. तिथे काशिनाथ दलाल यांनी मागणी केलेली आहे. त्यांना ती देण्यात यावे.

मा.सभापती :तपासून, सेवाभावी संस्था हे सर्व तपासून आणि दुरूस्तीची सर्व जबाबदारी संबधीताची राहील व मालकी मनपाची राहील त्या संस्थेचे हॉलचे.

श्री.रेणुकादास वैद्य :सर्वसाधारण सभेने घालुन दिलेल्या अटींच्या अधिन राहूनच अँग्रीमेंट करा.

मा.सभापती :अशा स्वरूपाचे सदरील सेवाभावी संस्थेला नाममात्र शुल्क आकारून प्रतिमहा हजार रूपये आकारून देण्यास हरकत नाही. स.सदस्य सौ.साधना सुरडकर यांचे वार्डातील संचिका बऱ्याच दिवसांपासून भाडे समितीकडे अडकून पडलेली आहे. भाडे समितीकडे न जाता डायरेक्ट स्थायी समितीमध्ये येवुन जी सर्वसाधारण सभेने ठरवुन दिलेले आहे.तात्काळ ठेवुन स्थायी समितीमध्ये मंजूरी देण्यात येईल.

श्री.रेणुकादास वैद्य :माझ्या वार्डातील हॉल बाबत एक वर्ष झालेले आहे. वारंवार पत्र व्यवहार केला परंतु प्रस्ताव स्थायी समितीत आला नाही.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, एन-5 सिडको येथील महानगरपालिकेच्या मालकीचे सभागृह कबीरबाग मठ संस्था / नवजीवन सेवाभावी संस्था, गुलमोहर कॉलनी या संस्थेस रू.1000/- प्रतिमाहप्रमाणे भाड्याने देण्यास तसेच मासिक भाड्याच्या बारापट अनामत रक्कम, सेवाशुल्क, अकृषी कराचा एक वर्षाचा आगावू भरणा करून घेवून व इतर कर आकारून महानगरपालिकेच्या हक्कात भाडेपट्टा करारनामा करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 97 :**

मा.आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद यांचे मान्यतेनुसार उपआयुक्त (सिडको), महानगरपालिका, औरंगाबाद हे प्रस्ताव सादर करीत आहे की, मो.गणेश कॉलनी येथील खाजगी मालकीचे मस्जिद व्यवस्थापन कमिटीची (आलमगीर मस्जिद) दोन खोल्या महानगरपालिका वाचनालयाकरीता घेणेसाठी उपआयुक्त (प्रशासन), महानगरपालिका, औरंगाबाद यांनी भाडे निश्चित करून देणेसाठी संचिका मालमत्ता विभागास वर्ग केली आहे. त्याअनुषंगाने सदर ठिकाणचे भाडे निश्चित करून भाडे समितीमध्ये मान्यता घेण्यात आलेली आहे. सदर ठिकाणच्या दोन खोल्याचे क्षेत्रफळ 55.76 चौ.मी. असून त्याचे सिध्द शिघ्र गणकानुसार रू.103/- प्रमाणे आकारून वाचनालयाकरीता भाड्याने घेणे योग्य.

करीता प्रस्ताव मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**संवाद :**

मा.सभापती :विषय क्रमांक 97

श्री.जगदिश सिध्द :महानगरपालिकेची जागा घेण्यात यावी.

श्री.विजय वाघचौरे :विषय क्रमांक 97 बाबत खुलासा करण्यात यावा की, का भाडयाने घेण्यात येत आहे.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : सदरील वार्डात वाचनालय नाही. महानगरपालिकेची जागा नाही.

श्री.विजय वाघचौरे :धार्मिक ठिकाणी करता येते का? खुलासा करण्यात यावा.

मा.सभापती :मनपाचे सभागृह असेल त्या ठिकाणी करण्यात यावे.

श्री.अ.साजेद अ.सत्तार :जागा लायब्ररीसाठी घेत आहे.

मा.सभापती :सभागृहाचे वाचनालय होत असेल तर काय हरकत आहे. आता सभागृहाचा उपयोग कशासाठी होतो. सभागृहाला वाचनालय बनवु या.

श्री.विजय वाघचौरे :सभागृह रिकाम्या अवस्थेत आहे. त्याचा वापर वाचनालयात करण्यात यावा.

श्री.अ.साजेद अ.सत्तार :वेगळया कारणासाठी त्याचा वापर होत आहे. या प्रस्तावाला काय अडचण आहे. प्रस्तावात मस्जिद लिहीले आहे म्हणुन करायचे नाही. विरोध करण्याचे कारण काय आहे. प्रस्ताव प्रशासनाने काही विचार करून ठेवलेला आहे.

श्री.जगदिश सिध्द :जातीवाद संभाषण करू नये. मस्जिदमध्ये वाचनालय झाले तर इतर नागरीक वाचनालयात जातील का?

मा.सभापती :प्रशासनाने खुलासा करावा.

श्री.जगदिश सिध्द :मनपाचे सभागृह आहे ते घेण्यात यावे.

उपआयुक्त (सिडको) :मुख्य प्रस्ताव हा उपआयुक्त प्रशासन यांचेकडून आलेला आहे. भाडे

निश्चितीसाठी मालमत्ता विभागाकडे आला होता. भाडेनिश्चितीसाठी हा प्रस्ताव स्थायी समितीसमोर ठेवलेला आहे. भाडेनिश्चितीपुरता हा विषय माझ्या विभागाशी संबधीत आहे. तो विभाग उपआयुक्त प्रशासन यांनी घ्यावे किंवा नाही घ्यावे हा त्या विभागाचा प्रश्न आहे.

श्री.रेणुकादास वैद्य :उपआयुक्त प्रशासन यांनी खुलासा करावा की, अशा पध्दतीने प्रस्ताव का आला.

उपआयुक्त (प्र) :उपआयुक्त प्रशासन म्हणुन चार्ज घेतला त्यापुर्वीची ही संचिका आहे. आजच्या तारखेला कुठलीही माहिती नाही.

श्री.रेणुकादास वैद्य :प्रशासनाला व कुणाला माहितीच नसेल तर या विषयाला स्थगीती द्यावी.

श्री.विजय वाघचौरे :स्थगीती देण्यात यावी.

श्री.रेणुकादास वैद्य :या मागील भुमिका स्पष्ट होणे कळणे आवश्यक आहे. जागा उपलब्ध नाही. कशासाठी हा प्रस्ताव आला याची माहिती व्हावी. प्रस्ताव कुणी ठेवला हे कळु द्या. कुणी खुलासाच करणार नसेल तर प्रस्ताव मंजूर कसा करायचा. ज्यावेळेस माहिती येईल त्यावेळेस चर्चा होईल त्यानंतर मंजूरी देण्यात येईल. विषय स्थगीत ठेवण्यात यावा.

श्री.अ.साजेद अ.सत्तार :प्रशासनाने प्रस्ताव ठेवलेला आहे.

श्री.रेणुकादास वैद्य :माहिती घेऊन पुढील बैठकीत मंजूरी देण्यात येईल.

मा.सभापती :भाडयाने देणार आहे परंतु मस्जिद महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये आहे का? हे बघावे लागेल.

**<u>ठराव :</u>**

सदर प्रस्ताव स्थगित करण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.

**<u>विषय क्र. 98 :</u>**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वॉर्ड क्र.16 सुदर्शननगर सिडको एन-11 येथील विविध ठिकाणच्या खुल्या जागेवर पेव्हर ब्लॉक बसविणे व खुल्या जागा विकसीत करणे, करीता सा.बां. विभागाचे सन 2008-09 च्या जिल्हा दरसुची नुसार रक्कम रू.19,99,360/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून त्यास मा.आयुक्त महोदय यांनी मा.स्थायी समितीकडे सादर करणे बाबत शिफारस केलेली आहे.

सदरील कामाचा खर्च सन 2010-11 या आर्थिक वर्षाअंतर्गत विकास योजने अंतर्गत भूखंडाचे संरक्षण या लेखाशिर्षातंर्गत उपलब्ध तरतुदीनुसार करण्यात येईल.

त्यानुसार उपरोक्त कामाचे अंदाजपत्रक रक्कम रू.19,99,360/- चा प्रस्ताव मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

मा.सभापती :विषय क्रमांक 98 ते 101 मंजूर. पाण्याचे तातडीचे असेल तर कामे करण्यात यावे नविन पाईपलाईन असेल तर थांबविण्यात यावे.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.16 सुदर्शननगर सिडको एन-11 येथील विविध ठिकाणच्या खुल्या जागेवर पेव्हर ब्लॉक बसविणे व खुल्या जागा विकसीत करणेच्या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रू.19,99,360/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. 99 :</u>**

आयुक्त,महानगरपालिका, औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहेत की, प्रभाग क्र.89 येथील दशमेशनगर भागातील रस्त्याचे पुनर्डांबरीकरण करणे या कामाकरीता सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन 2008-2009 च्या दरसुचीनुसार सदर कामाचे र.रू.19,93,199/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून सदर अंदाजपत्रकास मा.आयुक्तांनी प्रशासकीय मान्यता दिली आहे.

तरी सदर कामाचे रक्कम रू.19,93,199/- चे अंदाजपत्रक मंजूरीचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्र.89 येथील दशमेशनगर भागातील रस्त्याचे पुनर्डांबरीकरण करणे या कामाकरीता तयार करण्यांत आलेल्या र.रू.19,93,199/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. 100 :</u>**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वॉर्ड क्र.19 शिवनेरी कॉलनी अंतर्गत बळीराम पाटील शाळा ते डॉ.आंबेडकर चौकापर्यंत नविन रस्ता दुभाजक तयार करून सौंदर्यीकरण करणे या कामाचे अंदाजपत्रक सन 2008-09 च्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दरसुचीनुसार रक्कम रूपये 14,02,000/- चे तयार करण्यात आलेले आहे. सदर कामाचा खर्च सन 2010-11 च्या अर्थसंकल्पातून "नविन कॉंक्रीट रस्ते" या लेखाशिर्षातुन करण्यात येणार आहे. सदर अंदाजपत्रकीय प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर सादर करणेसाठी मा.आयुक्त महोदय यांनी शिफारस केली आहे.

करीता उक्त कामाचे रूपये 14,02,000/- चे अंदाजपत्रकीय प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.19 शिवनेरी कॉलनी अंतर्गत बळीराम पाटील शाळा ते डॉ.आंबेडकर चौकापर्यंत नविन रस्ता दुभाजक तयार करून सौंदर्यीकरण करणे या कामाचे तयार करण्यात आलेले रक्कम रूपये 14,02,000/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. 101 :</u>**

कार्यकारी अभियंता (वॉर्ड ब आणि क) प्रस्ताव सादर करीत आहे की, सिडको एन-11 येथील स्मशानभूमीची पश्चिम बाजुकडील संरक्षित भिंत आर.सी.सी. मध्ये बांधणे बाबतचे रक्कम रूपये 17,60,078/- चे अंदाजपत्रक सा.बां.विभागाच्या सन 2008-09 च्या जिल्हा दरसुचीनुसार तयार करण्यात आलेले आहे.

सदरील कामाचा खर्च अर्थसंकल्प सन 2010-11 अंतर्गत स्मशानभुमी विकास कार्यक्रम या लेखाशिर्षका अंतर्गत करण्यात येणार असून अंदाजपत्रकास दिनांक 07/12/2010 अन्वये मा.आयुक्त महोदय यांनी मंजुरी देवून मा.स्थायी समिती सभेसमोर प्रस्ताव सादर करणे बाबत शिफारस केलेली आहे.

करीता र.रू.17,60,078/- चे अंदाजपत्रक मा.स्थायी समिती सभेच्या मंजुरीस्तव व अवलोकनार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सिडको एन-11 येथील स्मशानभूमीची पश्चिम बाजुकडील संरक्षित भिंत आर.सी.सी. मध्ये बांधणे या कामाचे तयार करण्यांत आलेल्या रक्कम रूपये 17,60,078/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 102 :**

कार्यकारी अभियंता (स्लम/बीओटी), महानगरपालिका, औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मा.श्री.रामदास बोराडे, सभापती, गलिच्छ वस्ती निर्मूलन, घरबांधणी व समाज कल्याण समिती यांनी मो.आंबेडकरनगर येथील ग्रीव्हज कंपनी जवळील शौचालय पाडणे संदर्भाने पत्राद्वारे मागणी केल्यानुसार व सदर शौचालय अतिशय खराब झालेले असून यामूळे परिसरात दुर्गंधी होत असल्याने रोगराई पसरण्याची शक्यता नाकारता येत नाही. सदर वस्तीमधील प्रत्येक घरात शौचालय असल्याने सदरील शौचालयाचा वापर होत नाही. करीता सदर शौचालय निष्काषीत करण्यासाठी रक्कम रूपये 20,972/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून सदरील काम स्लम देखभाल व दुरूस्ती या लेखाशिर्षामधून प्रस्तावित आहे. त्यास प्रशासकीय व तांत्रिक मान्यता दिनांक 29/12/2010 रोजी देण्यात आलेली आहे. करिता मो.आंबेडकरनगर येथील ग्रीव्हज कंपनी जवळील शौचालय पाडणे बाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या मान्यतेस्तव सादर.

मा.सभापती : विषय क्रमांक 102 ते 105 मंजूर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मो.आंबेडकरनगर येथील ग्रीव्हज कंपनी जवळील अतिशय खराब झालेले शौचालय पाडण्यास व त्यासाठी लागणाऱ्या रक्कम रूपये 20,972/- च्या खर्चासह सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 103 :**

कार्यकारी अभियंता (स्लम/बीओटी), महानगरपालिका, औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मा.श्री.रामदास बोराडे, सभापती, गलिच्छ वस्ती निर्मूलन, घरबांधणी व समाज कल्याण समिती यांनी मो.आंबेडकरनगर येथील गौतमनगर स्थित शौचालय पाडणे संदर्भाने पत्राद्वारे मागणी केल्यानुसार व सदर शौचालय अतिशय खराब झालेले असून यामूळे परिसरात दुर्गंधी होत असल्याने रोगराई पसरण्याची शक्यता नाकारता येत नाही. सदर वस्तीमधील प्रत्येक घरात शौचालय असल्याने सदरील शौचालयाचा वापर होत नाही. करीता सदर शौचालय निष्काषीत करण्यासाठी रक्कम रूपये 35,827/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून सदरील काम स्लम देखभाल व दुरूस्ती या लेखाशिर्षामधून प्रस्तावित आहे. त्यास प्रशासकीय व तांत्रिक मान्यता दिनांक 29/12/2010 रोजी देण्यात आलेली आहे. करिता मो.आंबेडकरनगर येथील गौतमनगर स्थित शौचालय पाडणे बाबतचा प्रसताव मा.स्थायी समिती सभेच्या मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मो.आंबेडकरनगर येथील गौतमनगर स्थित अतिशय खराब झालेले शौचालय पाडण्यास व त्यासाठी लागणाऱ्या रक्कम रूपये 35,827/- च्या खर्चासह सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 104 :**

कार्यकारी अभियंता (रस्ते/इमारती/गुंठेवारी), यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे की, प्रभाग क्र.79, संघर्षनगर सिडको येथील खुल्या जागेत व्यायामशाळा बांधणे, या कामासाठी सार्वजनिक बांधकाम

विभागाच्या सन 2008-09 च्या जिल्हा दरसुचीनुसार रक्कम रू.11,30,709/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.

सदर कामाकरीता सन 2010-11 च्या अर्थसंकल्पात आर्थिक तरतूद उपलब्ध आहे. करीता रक्कम रू.11,30,709/- चे अंदाजपत्रक मान्यतेस्तव मा.स्थायी समिती सभेसमोर मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्र.79, संघर्षनगर सिडको येथील खुल्या जागेत व्यायामशाळा बांधणे या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रू.11,30,709/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 105 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.68 अंतर्गत विविध ठिकाणी रस्ते दुरूस्ती करणे, या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम खात्याचे सन 2008-09 च्या दरसूचीनुसार तयार करण्यात आले असून अंदाजपत्रकीय रक्कम रू.14,98,286/- होत आहे. सदरील काम सन 2010-11 च्या अर्थसंकल्पात रस्ते दुरूस्ती पॅचवर्क करणे या लेखाशिर्ष अंतर्गत प्रस्तावित आहे. प्रस्तावित अंदाजपत्रकास मा.आयुक्त महोदय यांनी प्रशासकीय मंजुरी देवून प्रस्ताव स्थायी समिती समोर ठेवण्यास शिफारस केलेली आहे.

तरी रक्कम रू.14,98,286/- चे अंदाजपत्रकाचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या मान्यतेस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.68 अंतर्गत विविध ठिकाणी रस्ते दुरूस्ती करणे या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रू.14,98,286/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 106 :**

मा.आयुक्त महोदय, महानगरपालिका, औरंगाबाद यांचे मान्यतेन्वये उपआयुक्त (सिडको), महानगरपालिका, औरंगाबाद हे प्रस्ताव सादर करीत आहे की, मो.विश्रांतीनगर जयभवानीनगर येथील सौ.निर्मला दत्ता काळे यांची इमारत ज्याचे क्षेत्रफळ 85.02 चौ.मी. असून शाळेकरीता भाड्याने घेणे बाबत मा.शिक्षणाधिकारी यांनी या विभागास दि.10/06/2010 रोजी संचिका दर निश्चितीसाठी पाठविण्यात आली असता सदर जागेचे सिध्द शिघ्र गणकानुसार दर रू.215/- प्रती चौ.मी. प्रती महा आकारणे योग्य. करिता प्रस्ताव मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**संवाद :**

श्री.सुर्यकांत जायभाये : विश्रांतीनगर येथील शाळेसाठी भाडयाने देण्यात यावी. सदर जागेचे दर रूपये 215 प्रती चौ.मी. त्याच भागामध्ये भारत नगर येथे 98.5 प्र.चौ.मी. हनुमान नगर येथे 144 प्र.चौ.मी. जागा आहे त्याचे भाडे 5,864/- एवढे आहे. मग या ठिकाणी 215 प्रमाणे 8000/- होते.

मा.सभापती :खुलासा करण्यात यावा.

उपआयुक्त (सिडको) :हे जे दर आहेत. भाडे समितीमध्ये आर.आर.चे कॅलक्युलेशन, बांधीव एरिया जो काही असेल त्यानुसार गणितीय पध्दतीने आलेले दर आहेत.

श्री.सुर्यकांत जायभाये :त्या ठिकाणी सर्व अनाधिकृत भाग आहे. 20 बाय 30 चे प्लॉट आहे. सर्व गुंठेवारीचा भाग आहे.

| | |
|---|---|
| श्री.रेणुकादास वैद्य | :त्याच वार्डात त्याच भागामध्ये सेम एरियामध्ये सेम रेडीरेकनर या भागात आहे याच भागातील हा विषय आहे. त्याच अनुषंगाने चार वेगवेगळया शाळांचे भाडे निश्चिती करण्यात आली. त्याचे आकडेवारीचे दर आपल्याकडे आहे. असे असतांना एवढे भाडेवाढ करून प्रस्ताव का ठेवण्यात आला. याचा खुलासा अपेक्षीत आहे. रेडीरेकनर त्या भागासाठी वेगवेगळा असू शकतो. पण सेम त्याच भागामधील रेडी रेकनरने दिलेल्या सगळया जागेचे भाडे आमच्याकडे आहेत. |
| श्री.विजय वाघचौरे | :जागा गुंठेवारी झालेली आहे काय? |
| श्री.अ.साजेद अ.सत्तार | :शासनाने शाळा घेण्यासाठी जे नियम ठरवुन दिलेले आहेत. त्या नियमानुसार हा प्रस्ताव आहे का? खुलासा करण्यात यावा. शासनाने नियम ठरवुन दिलेला आहे किती जागा पाहिजे . त्या नियमानुसार आहे का? |
| श्री.रेणुकादास वैद्य | :भाडयामध्ये प्रचंड मोठी तफावत आहे. ही तफावत का निर्माण होते व का अशा पध्दतीने स्थायी समितीसमोर प्रस्ताव आला खुलासा करण्यात यावा. |
| उपआयुक्त (सिडको) | :या प्रकरणी संचिका पुन्हा पाहुन चौकशी करून उत्तर देण्यात येईल. |
| श्री.रेणुकादास वैद्य | :पुर्नप्रस्ताव ठेवण्यात यावा. |
| श्री.अ.साजेद अ.सत्तार | :पुर्नप्रस्ताव ठेवण्यात यावा. |
| श्री.नासेर खान | :अनाधिकृत एरिया आहे त्या ठिकाणी घेऊ शकत नाही. |
| श्री.रेणुकादास वैद्य | :भाडे समितीने केलेले मुल्यांकन चुकीच्या पध्दतीचे आहे. त्याचा फेरविचार करण्यात यावा. अशा पध्दतीने मनपाची एखादी प्रॉपर्टी असेल तर त्या ठिकाणी शाळा चालू करता येते का याचाही विचार करण्यात यावा. इतर जागेची व स्वस्त दरात मिळेल काय याची तपासणी करून प्रस्ताव पुन्हा ठेवण्यात यावा. |
| श्री.जगदिश सिध्द | :भाडे समितीमध्ये कोण कोण सदस्य आहे खुलासा करण्यात यावा. |
| मा.सभापती | :भाडे समिती सदस्यांची नांवे वाचून दाखविण्यात यावी. |
| उपआयुक्त (सिडको) | :भाडे समितीमध्ये एकुण 7 सदस्य आहेत. मालमत्ता अधिकारी, उपआयुक्त (सिडको), सहाय्यक संचालक नगर रचना, अतिरिक्त शहर अभियंता, कार्यकारी अभियंता , मुख्य लेखापरिक्षक. |
| श्री.रेणुकादास वैद्य | :सात अधिकारी यांचेकडून संचिका हाताळली जात असेल तरी अशा चुकीच्या पध्दतीने रेट कसे येतात. पुर्नविचार करून प्रस्ताव ठेवण्यात यावा. |
| मा.सभापती | : पुनः विचार करून प्रस्ताव ठेवावा. |

**ठराव :**

सदर प्रस्ताव स्थगित करण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. 107 :**

आयुक्त,महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहेत की, श्री.एम.डी.सोनवणे, शहर अभियंता महानगरपालिका औरंगाबाद यांना हृदय रोग उपचारासाठी एकूण खर्च 4,79,599.00 एवढा आला आहे.सदर खर्चाच्या 5% रक्कम रूपये 23980.00 शासन निर्णय क्र.ए.एम.जी.2005/ 9/प्र.क्र.-1/ आरोग्य-3 दि.19/03/2005 अन्वये तसेच मा.स्थायी समिती सभेमध्ये दि. 5/2/2008 रोजी पारीत झालेला ठराव क्र.365 नुसार मनपा फंडात जमा करून घेण्यासाठी आवश्यक आहे.

संबंधीतांनी त्यांच्या उपचारासाठी खर्च केलेल्या एकूण रक्कम रू.4,79,599.00 पैकी अनुज्ञेय असलेला खर्च रू.4,70,002.00 इतका आहे. त्याच्या 90% रक्कम रू.4,23,002.00 इतकी

नियमानुसार देय आहे. संबंधीताला अग्रीम राशी रक्कम रू.1,50,000.00 देण्यात आलेली आहे. तरी संबंधीताच्या देण्यात येणाऱ्या देय रक्कमेतून अग्रीम राशी व 5% रक्कम वजा करणे आवश्यक आहे.

तरी संबंधीतास अनुज्ञेय खर्च रू.4,23,002.00 चे वैद्यकीय देयक मान्यता करण्याचा प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

मा.सभापती : विषय क्रमांक 107 मंजूर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्री.एम.डी.सोनवणे, शहर अभियंता महानगरपालिका औरंगाबाद यांना त्यांच्यावरील हृदय रोग उपचारासाठी झालेला अनुज्ञेय खर्च रू.4,23,002.00 चे वैद्यकीय देयक अदा करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 108 :**

कार्यकारी अभियंता, (स्लम/बीओटी), यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, प्र.क्र.21, मिसारवाडी नारेगांव वसाहतीत नविन जलनि:सारण वाहिन्या टाकणे (दुसरा टप्पा) बाबतच्या कामाचे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाच्या सन 2002-2003 च्या दरसुचीनुसार रक्कम रूपये 29,71,614/- चे अंदाजपत्रक असून सदरील कामाचा खर्च दलित वस्ती सुधार योजना या लेखा शिर्षकामधून प्रस्तावित आहे. सदर कामासाठी निविदा पत्रके मागविली असता, एकूण चार निविदा प्राप्त झाल्या व प्राप्त निविदा उघडण्यात आल्या असता, त्यात खालीलप्रमाणे दर भरून प्राप्त झाले.

| | | |
|---|---|---|
| 01. | श्री.रमेश अर्जुन सुर्यवंशी | 26.09% कमी दराने |
| 02. | श्री.सचिन वाकळे | 13.99% कमी दराने |
| 03. | मे.अरबाज कन्स्ट्रक्शन | 10.01% कमी दराने |
| 04. | मे.पार्थ कन्स्ट्रक्शन | 15.00% कमी दराने |

वरीलप्रमाणे प्राप्त निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या म्हणजे सर्वात कमी दराची व अंदाजपत्रकीय दरापेक्षा 26.09% कमी दराची श्री.रमेश अर्जुन सुर्यवंशी यांची निविदा प्राप्त आहे.

तरी सदरील कामासाठी श्री.रमेश अर्जुन सुर्यवंशी यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा 26.09% कमी दराच्या निविदेचा प्रस्ताव मान्यतेस्तव तथा विचारार्थ सविनय सादर.

मा.सभापती : विषय क्रमांक 108 मंजूर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्र.क्र.21, मिसारवाडी नारेगांव वसाहतीत नविन जलनि:सारण वाहिन्या टाकणे (दुसरा टप्पा) बाबतच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराची व अंदाजपत्रकीय दरापेक्षा 26.09% कमी दराची श्री.रमेश अर्जुन सुर्यवंशी यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

<u>ऐनवेळचे विषय</u>

**विषय क्र. 109 :**

कार्यकारी अभियंता (वार्ड ब आणि क) यांनी प्रस्ताव सादर करीत आहे की, वार्ड क्र.16 मयुरनगर अंतर्गत रस्त्याचे पुनर्डांबरीकरण करणे या कामाचे सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन 2010-2011 च्या दरसुची नुसार अ.प.रक्कम रू.1498950/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. या कामाचा खर्च सन 2010-11 या आर्थिक वर्षात शहरी भागात पुनर्डांबरीकरण करणे या लेखाशिर्षा मधून करण्यात येईल. सदर अंदाजपत्रकास मा.आयुक्त महोदय, यांची मान्यता होवून मा.स्थायी समिती समोर प्रस्ताव सादर करणेसाठी शिफारस केली आहे.

तरी अ.प.र.रू.1498950/- चे अ.प. प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर मंजूरीस्तव तथा विचारार्थ सादर.

श्री.रेणुकादास वैद्य : ऐनवेळचे विषय मंजूर करण्यात यावे.

मा.सभापती : ऐनवेळचे सर्व विषय मंजूर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.16 मयुरनगर अंतर्गत रस्त्याचे पुनर्डांबरीकरण करणे या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रू.1498950/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 110 :**

कार्यकारी अभियंता (वार्ड ब आणि क) यांनी प्रस्ताव सादर करीत आहे की, वॉर्ड क्र.16 मयुरनगर अंतर्गत विविध ठिकाणी गल्ल्यामध्ये कॉंक्रीट रस्ते तयार करणे व पेव्हर ब्लॉक बसविणे या कामाचे सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन 2010-2011 च्या दरसुची नुसार अ.प.रक्कम रू.1498900/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. या कामाचा खर्च सन 2010-11 या आर्थिक वर्षात नविन कॉंक्रीट रस्ते शहरी भाग या लेखाशिर्षा मधून करण्यात येईल. सदर अंदाजपत्रकास मा.आयुक्त महोदय, यांची मान्यता होऊन मा.स्थायी समिती समोर प्रस्ताव सादर करणेसाठी शिफारस केली आहे.

तरी अ.प.र.रू.1498900/- चे अ.प. प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर मंजूरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.16 मयुरनगर अंतर्गत विविध ठिकाणी गल्ल्यामध्ये कॉंक्रीट रस्ते तयार करणे व पेव्हर ब्लॉक बसविणे या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रू.1498900/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 111 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.13, विश्वासनगर मधील प्रोफेसर कॉलनी, एस.बी.एच. कॉलनी, फाजलपुरा व विविध ठिकाणी रस्त्याचे पुनर्डांबरीकरण करणे या कामाचे अंदाजपत्रक सा.बां. खात्याचे सन 2010-11 च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आले असून अंदाजपत्रकीय रक्कम रू.19,99,588/- होत आहे. सदरील काम सन 2010-11 च्या अर्थसंकल्पात पुनर्डांबरीकरण करणे या लेखाशिर्ष अंतर्गत प्रस्तावित आहे. त्यास मा.आयुक्त महोदय यांनी दिनांक 31/12/2010 रोजी मा.स्थायी समिती समोर ठेवण्यास मान्यता दिली आहे.

तरी रक्कम रू.19,99,588/- चे अंदाजपत्रक मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.13, विश्वासनगर मधील प्रोफेसर कॉलनी, एस.बी.एच. कॉलनी, फाजलपुरा व विविध ठिकाणी रस्त्याचे पुनर्डांबरीकरण करणे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.19,99,588/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 112 :**

शहर अभियंता, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला असून जायकवाडी विभागाची जीप क्रमांक एम.एच.20/ई-8259 ही 16 वर्षे जूनी झालेली आहे. व समांतर जलवाहिनीचे

कार्य प्रगती पथावर असल्याने जायकवाडी स्थापत्य विभागाची जीप वाहन निर्लेखित करून नविन खरेदी करणे आहे.

जूने वाहनाची किमंत गव्हर्नमेंट रजिस्टर व्हॅल्युअर कडून काढण्यात आली असून रूपये 39,000/- अधिक 12.5 टक्के व्हॅट आहे. व सदरील किमंतीस वाहन निर्लेखित करण्यास मनपा ऑक्शन कमीटीने मान्यता दिलेली आहे. सदरील वाहनाची महानगरपालिकेने निश्चित केलेल्या किमंतीस निर्लेखित करणे करीता शिफारस करण्यात येत आहे.

सदरील किमंत योग्य असून या किमतीत वाहन विक्री झाल्यास आलेली रक्कम नविन वाहन खरेदीस सहाय्यभुत ठरणार आहे. उपअभियंता जायकवाडी (स्थापत्य) यांचे करीता टाटा स्पेसीओ गोल्ड जीप खरेदी करीता वाहनाचे उत्पादक टाटा मोटार्स लि. मुंबई यांचे शासकीय दराप्रमाणे दरपत्रक कंपनीचे अधिकृत विक्रेते मे.सान्या मोटार्स, प्रा.लि. औरंगाबाद यांचेकडून प्राप्त केले आहे. दरपत्रकातील दर खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | विवरण | नग | किमंत प्रति वाहन | एकूण किमंत |
|---|---|---|---|---|
| 01. | Tata-Specio Gold BSIII (seating capacity 8+1 D) (Diesel)<br>जकात कर / इंशुरन्स वगळुन | 1 No | 501017/- | 5,01,017=00 |
| | | | **Total :-** | **5,01,017=00** |

विवरण तरी वरीलप्रमाणे जुनी जीप क्र.एम.एच.20/ई-8259 या वाहनाची निर्लेखित किमंत रूपये 39000/-+12.5 टक्के व्हॅट वसुल करणेस व नविन टाटा स्पेसीओ गोल्ड जीपच्या खरेदी रक्कम रूपये 501017/- खर्चास मा.आयुक्त यांनी शिफारस केली आहे. वाहनाचा ताबा घेतांना जी रक्कम येईल त्याप्रमाणे कमी किंवा जास्त रक्कम अदा करावी लागेल. वाहनाची किमंत र.रूपये 5,01,017/- टाटा मोटार्स लि. मुंबई यांना डिमांड ड्राफ्ट द्वारे अदा करावी लागेल.

तरी जायकवाडी स्थापत्य विभागाच्या जुन्या जीपचे निर्लेखन करणेस व टाटा स्पेसिओची गोल्ड जीप खरेदी करण्यासाठी रक्कम रूपये 5,01,017/- खर्चास प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, जायकवाडी स्थापत्य विभागासाठी टाटा स्पेसिओची गोल्ड जीप खरेदी करणे करीता वाहनाचे उत्पादक टाटा मोटर्स लि.मुंबई यांचे शासकीय दराप्रमाणे, कंपनीचे अधिकृत विक्रेते मे.सान्या मोटर्स प्रा.लि.औरंगाबाद यांचेकडून टाटा स्पेसिओची गोल्ड जीप खरेदी करण्यासाठी लागणाऱ्या रक्कम रूपये 5,01,017/- च्या खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

| अ.क्र. | विवरण | नग | किमंत प्रति वाहन | एकूण किमंत |
|---|---|---|---|---|
| 01. | Tata-Specio Gold BSIII (seating capacity 8+1 D) (Diesel)<br>जकात कर / इंशुरन्स वगळुन | 1 No | 501017/- | 5,01,017=00 |
| | | | **Total :-** | **5,01,017=00** |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. 113 :</u>**

अतिरिक्त शहर अभियंता, यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद महानगरपालिकेच्या सिध्दार्थ उद्यानात, सिध्दार्थ गौतम बुध्द यांचा पुर्णाकृती पुतळा उभारण्यास मा.सर्वसाधारण सभा

दिनांक 19/08/2002 रोजी विषय क्र.663/5 अन्वये ठराव पारित झालेला आहे. त्यानंतर मा.सर्वसाधारण सभा दिनांक 19/06/2006 च्या सभेत विषय क्र.271/4 अन्वये तथागत भगवान गौतम बुध्द यांचा पुर्णाकृती पुतळा उभारणेस देखील ठराव पारीत झालेला आहे. या ठरावांच्या अनुषंगाने सिध्दार्थ उद्यानातील दोन्ही रस्त्यामधील बेटात मुर्ती उभारणेसाठी तत्कालीन मा.महापौर यांचे अध्यक्षतेखाली दिनांक 04/06/2009 रोजी झालेल्या बैठकीत सध्या चौथाऱ्याचे / चबुतऱ्याचे काम प्रगतीपथावर असलेली जागा निवडण्यात आली आहे. सदर निवडण्यात आलेली जागा 25 फुट उंचीच्या मुर्तीसाठी प्रमाणात अथवा साजेशी नसल्यामूळे त्या ठिकाणी 25 फुट ऐवजी 15 फुट उंचीची मुर्ती बसविण्याचे वरील बैठकीत ठरल्यानुसार 15 फुट उंचीची मुर्ती तयार करण्याचे कार्यादेश शिल्पकारास देण्यात आलेले आहे व मुर्तीचे काम अंतिम टप्प्यात आहे. मुर्तीच्या आकारात झालेला बदल कार्यालयीन पत्र जा.क्र./मनपा/अशअ/481/2009, दिनांक 22/07/2009 अन्वये मा.महापौर, मा.सभापती, मा.आयुक्त तसेच नगरसचिव विभागास निदर्शनास आणुन देण्यात आला आहे.

15 फुट उंचीची मुर्ती उभारणेसाठी चौथरा बांधणे व परिसर विकसीत करणे या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम खात्याचे सन 2008-09 च्या दरानुसार तयार करण्यात आले असून अंदाजपत्रक रक्कम रूपये 15.00 लक्ष यास मा.स्थायी समिती सभा दिनांक 07/08/2009 विषय क्र.59 अन्वये प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे. सदर मंजुरीनंतर या कामाच्या निविदा मागविण्यात आल्या असता अंदाजपत्रकापेक्षा 5% जास्त व सर्वात कमी दराची श्री.मुबारक महेबुब पठाण यांची निविदा असल्यामुळे त्यास विषय क्र.85 दिनांक 18/08/2009 च्या मा.स्थायी समिती सभेत मान्यता प्राप्त झाल्यानुसार श्री.मुबारक पठाण यांना कार्यादेश देण्यात आला असून हे काम प्रगतीपथावर आहे.

मा.सभापती, स्थायी समिती, मा.सभापती, प्रभाग-अ, मा.मुख्यलेखाधिकारी, मा.शहर अभियंता, मुर्ती/पुतळ्याचे शिल्पकार, प्रस्तुत चबुतऱ्याचे काम करणारे कंत्राटदार, या कामाचे वास्तुविशारद श्री.विजय सांगवीकर यांची दिनांक 09/12/2010 रोजी संयुक्तीक पाहणी व कामाच्या ठिकाणी बैठक झाली असता या कामामध्ये काही अतिरिक्त कामे सुचविण्यात आलेली आहेत. तसेच पुतळ्याच्या/ मुर्तीच्या चबुतऱ्यावर छत टाकण्याऐवजी खुले ठेवण्यासह काही बदल करण्याचे संयुक्तीकरित्या बैठकीत ठरले आहे. मा.सभापती (स्थायी समिती) यांचे वरील बैठकीतील सुचनेनुसार अतिरिक्त करावयाच्या कामाचे अतिरिक्त बाबीसह सुधारीत अंदाजपत्रक रक्कम रू.18,12,993/- चे तयार करण्यात आले आहे. सुधारीत अंदाजपत्रक रक्कम रू.18,12,993/- चा प्रस्ताव समाविष्ट अतिरिक्त बाबीसह वाढीव रक्कम रू.3,12,993/- च्या मान्यतेस्तव मा.स्थायी समिती समोर सादर करणेसाठी मा.आयुक्त महोदय यांची दिनांक 29/12/2010 रोजी मान्यता प्राप्त आहे. प्रस्तुत सुधारीत अंदाजपत्रकातील अतिरिक्त बाबी सन 2010-2011 च्या दरसुची मधील अंदाजपत्रकीय दराने तसेच ज्या बाबी दरसुचीमध्ये समाविष्ट नाहीत त्या बाबी चालू बाजार भावानुसार दरपृथःकरण करून आणि उर्वरित बाबी निविदा मंजुर दराने श्री.मुबारक पठाण यांचेकडून करून घेणेचा प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद महानगरपालिकेच्या सिध्दार्थ उद्यानात, सिध्दार्थ गौतम बुध्द यांचा पुर्णाकृती पुतळा उभारणेच्या कामा संदर्भात मा.सभापती, स्थायी समिती, मा.सभापती, प्रभाग समिती-अ, मा.मुख्यलेखाधिकारी, मा.शहर अभियंता, मुर्ती/पुतळ्याचे शिल्पकार, प्रस्तुत चबुतऱ्याचे काम करणारे कंत्राटदार, या कामाचे वास्तुविशारद श्री.विजय सांगवीकर यांचे दिनांक 09/12/2010 रोजीच्या संयुक्तीक पाहणीत व मा.सभापती (स्थायी समिती) यांचेसह झालेल्या बैठकीतील सुचनेनुसार अतिरिक्त करावयाच्या कामाचे वाढीव रक्कम रू.3,12,993/- च्या अतिरिक्त बाबीसह रक्कम रू.18,12,993/-

च्या सुधारीत अंदाजपत्रकास तसेच सुधारीत अंदाजपत्रकातील अतिरिक्त बाबी सन 2010-2011 च्या दरसुची मधील अंदाजपत्रकीय दराने तसेच ज्या बाबी दरसुचीमध्ये समाविष्ट नाहीत त्या बाबी चालू बाजार भावानुसार दरपृथ:करण करून आणि उर्वरित बाबी निविदा मंजुर दराने श्री.मुबारक पठाण यांचेकडून करून घेणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 114 :**

मा.आयुक्त महोदय, महानगरपालिका औरंगाबाद यांचे मान्यतेन्वये उपआयुक्त (सिडको), महानगरपालिका, औरंगाबाद हे प्रस्ताव सादर करीत आहे की, एन-4 सिडको येथील हनुमान मंदिरलगतची खुली जागा बॅडमिंटन कोर्टसाठी भाडेतत्वावर मिळणेसाठी मा.पोलीस उपआयुक्त, परिमंडळ श्री.वसंत परदेशी यांनी दि.25/10/2010 रोजी पत्राद्वारे विनंती करून सदर प्रकरणाबाबत मा.श्री.प्रमोद राठोड, विरोधी पक्ष नेता यांनी पाठपुरावा केला आहे.

त्यानुसार सदर ठिकाणच्या खुल्या जागेचे क्षेत्रफळ 79.2 चौ.मी. असून सिध्द शिघ्र गणकानुसार प्रती चौ.मी. प्रती माह रू.31/- आकारणे योग्य. मासिक भाड्याच्या बारापट अनामत रक्कम, सेवा शुल्क, अकृषीक कर व इतर संलग्न करासह भरणा करून घेऊन भाडेपट्टा करारनामा करून घेणे योग्य.

करिता प्रस्ताव मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, एन-4 सिडको येथील हनुमान मंदिरलगतची खुली जागा बॅडमिंटन कोर्टसाठी भाडेतत्वावर मिळणेसाठी मा.पोलीस उपआयुक्त, परिमंडळ श्री.वसंत परदेशी यांनी दि.25/10/2010 रोजी पत्राद्वारे विनंती केल्यानुसार सदरील खुली जागा क्षेत्रफळ 79.2 चौ.मी. सिध्द शिघ्र गणकानुसार प्रती चौ.मी. प्रती माह रू.31/- आकारुन मासिक भाड्याच्या बारापट अनामत रक्कम, सेवा शुल्क, अकृषीक कर व इतर संलग्न करासह भरणा करून घेऊन भाडेपट्टा करारनामा करून घेणेसह सदर खुली जागा बॅडमिंटन कोर्टसाठी भाडे तत्वावर देण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 115 :**

मा.आयुक्त,महानगरपालिका,औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहे की, श्री.विजय रामराव काकडे, मजूर जलतरण विभाग यांनी पत्नीच्या प्रसुतीच्या व प्रसुती पश्चात बाळाच्या आजारावर उपचार करण्यासाठी एकूण रू.1,81,661=99 (रू.एक लाख एक्यांशी हजार सहाशे एकसष्ट पैसे नव्व्यान्नव फक्त) इतका खर्च आला आहे. सदर खर्चाच्या 5% रक्कम संबंधीताने रू.9083=00 (रू.नऊ हजार त्र्यांशी फक्त) शासन निर्णय क्र.ए.एम.जी.2005/प्र.क्र.1/आरोग्य-3, दिनांक 19/03/2005 तसेच मा.स्थायी समितीमध्ये दिनांक 05/02/2008 रोजी संमत झालेला ठराव क्र.365 नुसार मनपा फंडात जमा करणे आवश्यक आहे.

श्री.विजय रामराव काकडे, मजूर जलतरण विभाग यांनी पत्नीच्या प्रसुती व प्रसुती पश्चात बाळाच्या आजारावर उपचार करण्यासाठी एकूण रू.1,81,661=99 खर्च केला असून त्यापैकी अनुज्ञेय नसलेली रक्कम रू.24,738=00 वजा करता उर्वरीत अनुज्ञेय असलेली रक्कम रू.1,56,923=61 इतकी आहे. त्या रकमेच्या 90% रक्कम रू.1,41,223=00 इतका देय आहे. देय रकमेच्या 5% रक्कम रू.9083=00 वजा करणे आवश्यक असून उर्वरीत अनुज्ञेय होणारी रक्कम रू.1,32,148=00 (रू.एक लाख बत्तीस हजार एकशे अठ्ठेचाळीस फक्त) देय आहे.

मा.मुख्य लेखा परिक्षक, यांनी संबंधीताने त्यांच्या पत्नीच्या आजारावर उपचार शासनमान्य रूग्णालयामध्ये न करता खाजगी रूग्णालयामध्ये उपचार घेतला आहे. त्यास रू.40,000/- मर्यादेत

वैद्यकीय परिपुर्तीस पात्र आहे. तथापी संबंधीतानी रू.1,41,231/- एवढा वैद्यकीय खर्च सादर केलेला असून सदरील प्रकरणात विशेष बाब म्हणून मा.स्थायी समितीची मान्यता घेणे योग्य राहील, असा अभिप्राय दिला आहे.

करीता श्री.विजय रामराव काकडे, मजूर, जलतरण विभाग यांना पत्नीच्या प्रसुती व प्रसुती पश्चात बाळाच्या आजारावर उपचारासाठी झालेला खर्च रू.1,41,231/- विशेष बाब म्हणुन वैद्यकीय देयक अदा करणेसाठी प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेत मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्री.विजय रामराव काकडे, मजूर, जलतरण विभाग यांना पत्नीच्या प्रसुती व प्रसुती पश्चात बाळाच्या आजारावर उपचारासाठी झालेला खर्च रू.1,41,231/- विशेष बाब म्हणुन वैद्यकीय देयक अदा करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 116 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, श्रीमती साजेदा फहीम सह शिक्षिका केंद्र किराडपुरा 1 शिक्षण विभाग मनपा औरंगाबाद यांच्या पतीच्या (श्री.सय्यद आकेफ रजवी) हृदयरोगावरील उपचारार्थ झालेल्या खर्चाची रू.2,32,612/- ची प्रतिपुर्ती मनपा कार्यालयामार्फत होणे बाबत आवश्यक कागदपत्रासह मागणी केली आहे.

सदरील आजार मनपा गंभीर आजाराच्या यादीत (तिव्र हृदयरोग) या मध्ये समावेश असून एकूण देयक रू.2,32,612/- पैकी अनुज्ञेय नसलेले देयक रक्कम रू.4598 वजा जाता रू.2,28,014 च्या 90% रक्कम रू.2,05,212/- इतकी देय आहे. त्यातून एकूण रक्कमेच्या 5% रक्कम रू.11631/- मनपा फंडात जमा करणे आवश्यक आहे. (2,05,212-11631=1,93,581) वरिलप्रमाणे वैद्यकीय खर्चापोटी देय असणारी रक्कम रूपये 1,93,581/- (रक्कम एक लाख त्र्यान्नव हजार पाचशे एक्यांशी मात्र) श्रीमती साजेदा फहीम सहशिक्षिका किराडपुरा-1 यांना अदा करण्याचे विचारार्थ तथा मान्यतेस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्रीमती साजेदा फहीम सह शिक्षिका केंद्र किराडपुरा 1 शिक्षण विभाग मनपा औरंगाबाद यांच्या पतीच्या (श्री.सय्यद आकेफ रजवी) हृदयरोगावरील उपचारार्थ झालेल्या खर्चापोटी देय असलेली रक्कम रूपये 1,93,581/- (रक्कम एक लाख त्र्यान्नव हजार पाचशे एक्यांशी मात्र) चे देयक श्रीमती साजेदा फहीम सहशिक्षिका किराडपुरा-1 यांना अदा करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 117 :**

कार्यकारी अभियंता (वॉर्ड ब आणि क) यांनी प्रस्ताव सादर करीत आहे की, वार्ड क्र.88 शिवकृपा कॉलनी, सेवानगर भिमाशंकर कॉलनी येथे ड्रेनेज लाईन टाकणे या कामाचे सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन 2010-2011 च्या दरसुचीनुसार अ.प.रक्कम रू.1495990/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. या कामाचा खर्च सन 2010-11 या आर्थिक वर्षात भांडवली कामे जलनि:सारण (शहर) भाग या लेखा शिर्षा मधून करण्यात येईल. सदर अंदाजपत्रकास मा.आयुक्त महोदय, यांची मान्यता होवून मा.स्थायी समिती समोर प्रस्ताव सादर करणेसाठी शिफारस केली आहे.

तरी अ.प.र.रू.1495990/- चे अ.प. प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर मंजूरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.88 शिवकृपा कॉलनी, सेवानगर भिमाशंकर कॉलनी येथे ड्रेनेज लाईन टाकणे या कामाचे तयार करण्यांत आलेले रक्कम रू.1495990/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 118 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.63 अंतर्गत कोकणवाडी ते क्रांतीनगर रस्त्यावरील पुलाचे बांधकाम करणे या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम खात्याचे सन 2010-11 च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आले असून अंदाजपत्रकीय रक्कम रू.18,65,431/- होत आहे. सदरील काम सन 2010-11 च्या अर्थसंकल्पात नविन खडी रस्ते या लेखाशिर्ष अंतर्गत प्रस्तावित आहे. प्रस्तावित अंदाजपत्रकास मा.आयुक्त महोदय यांनी प्रशासकीय मंजुरी देवून प्रस्ताव स्थायी समिती समोर ठेवण्यास शिफारस केलेली आहे.

तरी रक्कम रू.18,65,431/- चे अंदाजपत्रकाचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या मान्यतेस्तव व विचारार्थ सादर.

**संवाद :**

श्री.रेणुकादास वैद्य :माझ्या वार्डातील एक संचिका आहे ऐणवेळी विषय मंजूर करण्यात यावा. जाहीर निवीदा झालेली आहे.

मा.सभापती : स.सदस्य श्री.रेणुकादास वैद्य यांचे वार्डातील विषय मंजूर करण्यात येत आहे. सौ.साधना सुरडकर यांचे वार्डातील संचिकाही मंजूर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.63 अंतर्गत कोकणवाडी ते क्रांतीनगर रस्त्यावरील पुलाचे बांधकाम करणे या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रू.18,65,431/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 119 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्र.64 अंतर्गत उस्मानपुरा येथील गोपाल कल्चरल हॉल ते वर्मा चौक पर्यंतच्या रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण करणे या कामासाठी सन 2008-09 च्या जिल्हा दरसुचीनुसार रक्कम रू.49,83,200/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून, त्यास प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे. सदरील कामाच्या निविदा मागविण्यात आल्या असता, एकूण 4 निविदा विक्री झाल्या व 4 निविदा दर भरून प्राप्त झाल्या.

| अ.क्र. | एजन्सीचे नांव | प्राप्त दर |
|---|---|---|
| 01. | मे.मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन | 28 % जास्त दराने |
| 02. | श्री.एम.ए.सिद्दीकी | 28.86 % जास्त दराने |
| 03. | मे.आदिनाथ कन्स्ट्रक्शन | 45.51 % जास्त दराने |
| 04. | मे.राजेश्वर कन्स्ट्रक्शन | 45.55 % जास्त दराने |

उपरोक्त पैकी सर्वात कमी दराची निविदा अंदाजपत्रकीय दरापेक्षा 28% जास्त दराची मे.मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन यांची आहे. सदरील निविदा दराची सन 2010-2011 च्या दरसुचीनुसार तुलना केली असता 0.29% जास्त दर येत आहेत. संबंधीत गुत्तेदाराने सदर काम अंदाजपत्रकीय दराने करण्यास समक्ष लेखी सहमती दिलेली आहे. त्यानुसार सदर काम अंदाजपत्रकीय दराने करून घेण्याच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली आहे.

तरी मे.मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन यांची उपरोक्त कामाची अंदाजपत्रकीय दराच्या निविदेचा प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्र.64 अंतर्गत उस्मानपुरा येथील गोपाल कल्चरल हॉल ते वर्मा चौक पर्यंतच्या रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण करणे या कामासाठी प्राप्त झालेल्या तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदा धारकांनी लेखी सहमती दिल्यानुसार सदर काम मे.मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन यांच्याकडून अंदाजपत्रकीय दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**चर्चा :**

श्री.विजय वाघचौरे :क्रांतीनगर ते कोकणवाडी येथील नाल्याचे काम त्वरीत सुरू करण्यात यावे. पुल पुर्ण पडलेला आहे. ट्रॅफिक जॅम होत आहे व अपघात घडत आहे. काम सुरू करण्याचे त्वरीत आदेशीत करावे.

श्री.महेश माळवतकर :एन-9 येथील नाल्याचे दुरूस्तीचे दोन टेंडर मंजूर झालेले आहे. त्यातील एक कंत्राटदार गेल्या तीन महिण्यांपासून 2 टक्के भरत नाही. कंत्राटदार काम करण्यास तयार नसेल तर सेंकड लोएस्टला काम देण्यात यावे. वार्ड नंबर 13 मध्ये पावसाचे पाणी वाहुन जाण्यासाठी दोन टेंडर मंजूर झालेले आहे. एक टेंडरचे वर्क ऑर्डर झालेले आहे दुसरे टेंडर तीन महिण्यांपासून 2 टक्केची भरणा करीत नाही. वर्क ऑर्डर घेत नाही. नाला एस.पी. भवन पासून सत्संगपर्यंत पुर्ण बांधुन झाला आहे. पुढील काम करणे अत्यंत आवश्यकता आहे. वर्क ऑर्डर झालेली आहे ते काम करण्यास सांगीतले पाहीजे. दुसऱ्या नंबरच्या कंत्राटदाराला काम करणेचे आदेशीत करण्यात यावे.

मा.सभापती :संबधीत कंत्राटदाराला ब्लॅक लिस्ट करण्यात यावे तीन महीण्यांपासून काम बंद आहे.

श्री.रेणुकादास वैद्य :महानगरपालिकेचा अर्थसंकल्प तयार करण्यास उशीर झाला. मनपाची आर्थिक परिस्थिती बरोबर नाही. काही कंत्राटदार जाणीवपुर्वक दोन टक्के रक्कम भरत नाही. विनंती करण्यात येते की, त्यांना ब्लॅक लिस्ट करून त्वरीत सेकंड लोएस्ट कंत्राटदाराला काम देण्यात यावे. अशा सूचना देण्यात यावे.

मा.सभापती :कंत्राटदारांनी निवीदा भरल्यानंतर काम मिळाल्यानंतर काम करीत नसेलतर त्यांना ब्लॅकलिस्ट करण्यात यावे. सेकंड लोएस्टला बोलावुन त्यांचेशी वाटाघाटी करून कामे देण्यात येवुन काम करण्यात यावे.

सौ.साधना सुरडकर :वार्डातील हॉलचे काम अर्धवट स्थितीत आहे. बजेटमध्ये तरतुद ठेवण्यात आलेली आहे. दोन तीन वर्षापासून कंत्राटदार काम करीत नाही. काम करणार नसेलतर सेकंड लोएस्टला काम देण्यात यावे.नसता नव्याने टेंडर करण्यात यावे.

मा.सभापती :स.सदस्यांचे वार्डातील काम अर्धवट स्थितीत झालेले आहे. त्या कामाची चौकशी करून काम होणार आहे किंवा नाही. ठेकेदार काम करण्यास तयार नसेल तर त्यांना ब्लॅकलिस्ट करण्यात यावे. किंवा त्यांचेकडून पुढील काम करून घेण्यात यावे. यावर योग्य तो मार्ग काढून पुढील बैठकीत माहीती देण्यात यावी.

| | |
|---|---|
| सौ.साधना सुरडकर | :निधी लागत नसलेले कामेही वार्डात होत नाही. माझ्या वार्डातील अतिक्रम काढण्याबाबत माहीती दिली परंतु अतिक्रमण काढण्यात येत नाही. |
| श्री.रेणुकादास वैद्य | :प्रशासकीय विभागातुन कार्यवाही का होत नाही. |
| मा.सभापती | :स.सदस्यांनी सांगीतल्यानंतर दुसऱ्या दिवशी कार्यवाही झाली पाहीजे त्याचा अहवाल संबधीत नगरसेवकांना दिला पाहीजे. |
| श्री.रेणुकादस वैद्य | :ज्या पध्दतीने ज्युनिअर इंजिनिअर यांचे बदल्या झाल्यात त्यांची यादी देण्यात यावी. इमारत निरीक्षक कोण आहे याची माहीती देण्यात यावी. |
| मा.सभापती | :स.सदस्यांना माहीती देण्यात यावी. |
| सौ.साधना सुरडकर | :माहीती देण्यात यावी मनपाची मालमत्तेचे संरक्षण करीत आहे. |
| श्री.रेणुकादास वैद्य | :आमच्या वार्डात इमारत निरीक्षक कोण आहे याची माहीती देण्यात यावी जेणे करून इमारत निरीक्षकास आम्ही माहीती देऊ. |
| मा.सभापती | :महानगरपालिकेने ज्या ज्या ठिकाणचे अतिक्रमण काढले वादग्रस्त ठिकाणचे अतिक्रमण काढले उदा.गुलमंडी, पैठणगेट येथील अतिक्रमण काढल्यानंतर तात्काळ त्या ठिकाणी रोड तयार केल्यास, पॅचवर्क केल्यास अतिक्रमण होणार नाही. नाहीतर पुन्हा अतिक्रमणाची कारवाई करावी लागणार आहे. |
| श्री.विजय वाघचौरे | :माझ्या वार्डात दहा हजार चौ.फुट जागा मनपाची आहे. त्या जागेचा आजपर्यंत ताबा घेतलेला नाही. जागा ताब्यात घेण्यासाठी अनेकपत्र देण्यात आलेले आहे. त्या जागेवर अतिक्रमण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. |
| सौ.साधना सुरडकर | :अतिक्रमण विषयी प्रशासनास सांगण्यात येते त्यावेळी लक्ष देण्यात येत नाही. गेल्या पावसाळयात शिवराज कॉलणी येथे पाणी आले ते नाल्यातील अतिक्रमणामुळे पाणी आले होते आणि लोकांच्या जिवीतास धोका निर्माण झाला वित्तहाणी झाली यास जबाबदार अतिक्रमण विभाग आहे. अतिक्रमणाच्या बाबतीत सांगण्यात येते त्यावेळेस दुर्लक्ष होते. |
| मा.सभापती | :स.सदस्यांनी सुचना केल्यास त्याचे तंतोतंत पालन झाले पाहीजे. काय कार्यवाही झाली याची माहीती संबधीत नगरसेवकांना देण्यात यावी. |
| सौ.साधना सुरडकर | :नाल्यातील अतिक्रमणामुळे पुढील पावसाळयातही वित्तहाणी होऊ शकते. |
| मा.सभापती | :नाल्यातील अतिक्रमण ताबडतोब काढण्यात यावे. |
| श्री.अ.साजेद अ.सत्तार | :शासनाने शाळेतील विद्यार्थ्यांना बससाठी पासेस दिलेले आहे. मागील चार महीन्यापासुन प्रशासनाने निधीचा काय विनीयोग केला आहे. माहीती देण्यात यावी. परीपत्रक येवुन चार महीने झालेले आहे. विद्यार्थ्यांना पैसे मिळाले नाही. बस पास साठी पैसे आले. 4 महिने झाले. |
| मा.सभापती | :खुलासा करण्यात यावा. |
| प्र.शिक्षणाधिकारी | : सहलीसाठी किंवा याबाबीसाठी आपल्याकडे वेगळे पैसे आलेले नाहीत. आपल्याकडे जे पैसे आलेले आहेत ते अल्पसंख्यांक मुलांच्या उपस्थितीबाबतचे पैसे आहे ते शाळास्तरावर वितरीत केलेले आहे. शाळास्तरावर पालकांच्या उपस्थितीत त्यांचे वाटप करण्यात येते.इतर कुठलेही पैसे विभागाला प्राप्त झालेले नाही. |

श्री.मधुकर सावंत :अर्थसंकल्प तयार करण्यास उशीर झालेला आहे. डिसेंबर जानेवारीत अर्थसंकल्प पुस्तक प्राप्त झालेले आहे. मा.आयुक्तांनी टेंडर झालेले वर्क ऑर्डर झालेले कामे थांबविण्यात आल्याबाबतची बातमीची माहीती मिळाली. मनपाची आर्थिक परिस्थिती डबघाईला आली. डबघाईला आली म्हणजे काय झाली. यास जबाबदार कोण कोण आहे. यासंबधीत खुलासा मुख्य लेखापरिक्षक, मुख्यलेखाधिकारी आणि मा.आयुक्त यांनी दयावे.

सौ.साधना सुरडकर :ही सर्व परिस्थिती येण्यामधे वसुली ही सगळयात महत्वाची बाब होय.

श्री.मधुकर सावंत :नगरसेवक संचिका घेउन या विभागातुन त्या विभागात जात आहे. परंतु कामे होत नाही. जनतेने कामे करण्यासाठी निवडून दिलेले आहे. मनपाची आर्थिकस्थिती खराब आहे. यास कारणीभुत कोण आहे. माझ्या माहीती प्रमाणे सर्व जबाबदारी मुख्यलेखाधिकारी यांची असते. शासनाकडून आलेले आहेत. पैशाचे नियोजन योग्य प्रकारे झाले पाहीजे. कशाप्रकारचे नियोजन केलेले आहे. खुलासा करण्यात यावा. मुख्यलेखाधिकारी या पदावर रूजु झाल्यापासूनची परिस्थिती सांगण्यात यावी.

मा.सभापती :खुलासा करण्यात यावा.

मुख्यलेखाधिकारी :जुन 2009 मध्ये मनपामध्ये रुजु झालेलो आहे. महानगरपालिकेची आर्थिकस्थिती सध्या बिकट आहे हे मान्य करावे लागेल. दरवर्षी अंदाजपत्रामध्ये उत्पन्नाचे आणि खर्चाचे अंदाज व्यक्त केले जातात. त्यानुषंगाने प्राप्त होणारे उत्पन्न निश्चित कमी आहे. जकात ठरल्यानुसार प्राप्त होत आहे परंतु इतर मार्गातुन स्त्रोतातुन मिळणारे उत्पन्न 50 टक्केच्या आसपास आहे. मालमत्ता कर 50 टक्के, पाणीपट्टी 30 टक्के बाकी इतर उत्पन्न 50 ते 60 टक्केच प्राप्त होत आहे. जमाबाजुचे उत्पन्न जेवढे ग्राहय धरले जाते तेवढे प्राप्त होत नाही. त्यानुषंगाने बजेट मध्ये खर्च दाखविण्यात येतो. खर्च हा जास्त प्रमाणात होतो. गेल्या 10 वर्षापासून लायबलिटी वाढत जावुन आज जवळपास 200 कोटींची पाठीमागील पुढे कॅरि फॉरवर्ड झालेली आहे. 10 वर्षाचा डाटा देण्यात आलेला आहे. प्रत्येक वर्षी मायनस (-) मध्ये अंदाजपत्रक केल्यानंतर आणि प्रत्यक्ष वसुली किती आहे. मुळ प्रशासनाने स्थायी समितीला सादर केलेले अंदाजपत्रक मा.स्थायी समितीने मंजूर केलेले अंदाजपत्रक मा.सर्वसाधारण सभेने मंजूर केलेले अंदाजपत्रक त्यानंतर सुधारीत अंदाजपत्रक डिसेंबरमध्ये करण्यात येते. जेवढे खर्च प्रत्यक्षात झालेले आहे. रिवाइज डिसेंबर मध्ये करण्यात येते आणि प्रत्यक्षात मार्चमध्ये अंतिम आकडा प्राप्त होतो किती रक्कम प्राप्त झाली. रिवाइज आणि प्रत्यक्ष प्राप्ती यामधील फरक हा मागील 10 वर्षीचा जवळपास 150 कोटींचा आहे. हे दर्शविण्यात आलेले आहे ही परिस्थिती अशीच चालू आहे. यास गेल्या 10 वर्षापासूनची परिस्थिती जबाबदार आहे. एका दिवसात सहा महिण्यात वर्षभरात ही परिस्थिती निर्माण झालेली नाही.

श्री.मधुकर सावंत :गेल्या 10 वर्षापासून या सभागृहाचा सदस्य आहे. तत्कालिन मुख्यलेखाधिकारी श्री.खैरनार असतांना महानगरपालिकेची आर्थिक स्थिती चांगली होती. कर्मचाऱ्यांचे पगार वेळेवर होत होते. एक वर्षापासुन मुख्यलेखाधिकारी यापदाचा

चार्ज घेतलेला आहे चुकीची माहिती देत आहे. तत्कालिन मुख्यलेखाधिकारी श्री.खैरनार असतांना कर्मचाऱ्यांचे पगार वेळेवर होत होते. तीन महिण्यांचा पगार राखीव राहात होता. परंतु मुख्यलेखाधिकारी यांनी कुठलीही जमाबाजू न बघता सर्रास खर्च करण्यास सुरूवात केलेली आहे. मुख्यलेखाधिकारी यांनी कुठलीही संचिका थांबविलेली नाही. बजेटमध्ये एक कोटी पंच्च्याहत्तर लाख जमा असतांना बारा कोटींचे चेक वाटण्यात आलेले आहे. मनपाचा कुणी चेक घेत नाही कुठली कामे होत नाही यास जबाबदार मुख्यलेखाधिकारी आहेत. मनपाकडे कर्मचाऱ्यांचे पगारासाठी रक्कम नाही नियम असा आहे मनपाच्या मुख्यलेखाधिकारी यांनी तीन महिन्यांचा वेतनराखीव केला पाहीजे. वेतन जमा आहे का? सांगण्यात यावे.

मुख्यलेखाधिकारी :जमा नाही. पहिल्यापासूनच जमा नाही.

श्री.मधुकर सावंत :वेतनराखीव ठेवले पाहीजे. हिशोबाचे नियोजन योग्य प्रकारे केले पाहीजे. मुख्यलेखापरिक्षक यांना विचारणा करण्यात यावी ही जबाबदारी कुणाची आहे.

श्री.अ.साजेद अ.सत्तार :यास मुख्य कारण वसुली आहे वसुली होत नाही.

श्री.नासेर खान :एक अधिकारी यास जबाबदार नाही. पुर्ण प्रशासन यास जबाबदार आहे.

श्री.महेश माळवतकर :एका अधिकारी यांना दोषदेणे चुक आहे. इस्टीमेट सर्वप्रथम जे.ई. तयार करतो. जेव्हा जे.ई. बनवतो तेव्हा आपल्या बजेटच्या कामासंबधी कलम विभाग प्रमुखांकडून टाकली जातात. शेवटी मंजुरी मा.आयुक्तांच्या लेवलपर्यंत असते. मागच्या सभागृहात 5 (2) (2) ची कामे कोणत्या बेसवर झाली. यास मा.आयुक्तांची परवानगी होती का? जर ती कामे रोखली असती तर आज ही परिस्थिती आली नसती.

श्री.मधुकर सावंत :मुख्यलेखापरिक्षक यांना कलम 105 प्रमाणे खुलासा करण्यांस सांगण्यात यावे.

श्री.अ.साजेद अ.सत्तार :5 (2) (2)चे अधिकार मुख्यलेखाधिकाऱ्यांचे आहे काय? 5 (2) (2) चे कामे मुख्यलेखाधिकारी मंजूर करतात काय खुलासा करण्यात यावा.
5 (2) (2) वापरण्याचा अधिकार कुणाचा आहे.

श्री.नासेर खान : 5 (2) (2)चे अधिकार कुणाचे आहे.

श्री.महेश माळवतकर :एका अधिकाऱ्यांला टार्गेट करण्याचा प्रयत्न करण्यात येवु नये. ही सर्वांची जबाबदारी आहे. वार्डात कामे होत नसेल तर यास पुर्ण प्रशासन जबाबदार आहे. यांचेवर काय कार्यवाही होणार आहे.

श्री.मधुकर सावंत : 5 (2) (2)ची किती कामे झाली खुलासा करण्यात यावा.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : 5 (2) (2) मुळे ही आर्थिक स्थिती आली का? खुलासा करण्यात यावा. एकटया अधिकाऱ्याला टार्गेट करू नका. ज्युनिअर इंजिनिअर, उपअभियंता, कार्यकारी अभियंता, शहर अभियंता आणि मा.आयुक्त, डायरेक्ट केलेले नाही. मुख्यलेखाधिकारी यांनी एकटयाने केलेले नाही. माहीती अधिकारात माहीती मागवुन कार्यवाही करा. मा.उच्च न्यायालयात, मा.सर्वोच्च न्यायालयात जावे व त्यातुन निर्णय आणावे. सभागृहाची वेळ वाया घालु नका. कोणतेही काम महानगरपालिकेतील अधिकारी एकटा करीत नाही. जे.ई. मा.आयुक्त, मुख्यलेखाधिकारी एकटा काम करीत नाही. 5 (2) (2) चा कायदा बदलणार

का? कायदा आहे की नाही याचाही खुलासा करण्यात यावा.

श्री.मधुकर सावंत : 5 (2) (2) व 67 (3) खाली किती कामे झाली व त्या कामाचे महत्व काय खुलासा करण्यात यावा.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : 5 (2) (2) मध्ये कायदा आहे काय, करायचे कशात करायचे.

श्री.मधुकर सावंत :सांगण्यात यावे. मुख्यलेखापरिक्षक यांचेकडून खुलासा घेण्यात यावा.

श्री.अ.साजेद अ.सत्तार :दोषी असेलतर कार्यवाही करण्यात यावी. कमेटी बनवा, दोषी असेल तर कार्यवाही करा.

श्री.रेणुकादास वैद्य : 5 (2) (2)चा अधिकार या सभागृहाचा निश्चितपणे आहे परंतु त्याचा योग्य पध्दतीने वापर होयला पाहीजे हे महत्वाचे आहे. स.माजी सभापती जे सांगतात त्याप्रमाणे रूलिंग देण्यास काही हरकत नाही. 5 (2) (2) मध्ये जी कामे झाली ती झालीत का त्याची आवश्यकता होती का? याबाबत चौकशी समिती नेमण्यात यावी. आणि त्याचा या वर्षीच्या कामामध्ये परिणाम होतो का हे पहाण्यात यावे आणि दोषी असेलतर योग्य पध्दतीने कार्यवाही करा. 5 (2) (2)साठी स्वतंत्र चौकशी कमिटी गठीत करण्यात यावी.

श्री.मधुकर सावंत :सभागृहामध्ये मुख्यलेखा परिक्षकास खुलासा करण्यास सांगण्यात यावे.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : 5 (2) (2) मध्ये एकटया अधिकाऱ्याला टार्गेट करू नका.

श्री.रेणुकादास वैद्य : प्रश्न एकटया अधिकाऱ्याला टार्गेट करण्याचा नाही या सभागृहाचा अधिकाराचा प्रश्न नाही. अधिकाराचा वापर योग्य पध्दतीने झाला की नाही याची तपासणी होणे आवश्यक आहे. चौकशी समिती नियुक्त करण्यात यावी.

श्री.अ.साजेद अ.सत्तार :समिती नियुक्त करण्यात यावी. कुणी जबाबदार असेल कार्यवाही करावी. लटकविण्याचे आदेश द्या. एकटया अधिकाऱ्याला टार्गेट करू नका.

श्री.रेणुकादास वैद्य :इथे कुणी एकटया अधिकाऱ्याला टार्गेट करण्यासाठी सभागृहात येत नाही. टार्गेट करण्यासाठी कुणी आमचे इथे दुश्मन नाही. महानगरपालिकेला काही शिस्त असायला पाहीजे. महानगरपालिकेचे नियमाचे योग्य प्रकारे वापर झाल पाहीजे.

श्री.मधुकर सावंत : 5 (2) (2) मध्ये 100 कोटींचे कामे झालेली आहेत.

श्री.अ.साजेद अ.सत्तार :मनपामध्ये कर्मचाऱ्यांना करण्यासाठी पगार नाही आणि 100 कोटींचे कामे झाली असे सांगीतले जाते. 100 कोटी कशाला म्हणतात. मी या पदाचा राजीनामा देवुन टाकील 100 कोटींचे असेल तर.

श्री.मधुकर सावंत :मनपाच्या आर्थिकस्थितीबाबत चर्चा करण्यासाठी उभा राहीलेलो आहे. आरोप प्रत्यारोप करण्यासाठी उभा राहीलेलो नाही.

श्री.रेणुकादास वैद्य : 5 (2) (2) मध्ये किती कामे झाले याचा खुलासा कळु द्या.

श्री.मधुकर सावंत :मला माहीत नाही मुख्यलेखापरिक्षकांकडे सुपूर्त करावा.

याचवेळी अनेक स.सदस्य एकाच वेळी बोलत असतात.

श्री.रेणुकादास वैद्य : 5 (2) (2) मध्ये झालेल्या कामाबाबत मुख्यलेखापरिक्षक श्री.जाधव यांचे अध्यक्षतेखाली ऑडीट करण्यात यावे. कामे झाली आहे की नाही. योग्य पध्दतीने झाली की नाही. कामाची आवश्यकता होती की नाही. 5 (2) (2) चा योग्य वापर झाला की नाही या सर्व गोष्टींची कार्यवाही होणे आवश्यक आहे.

| | |
|---|---|
| श्री.जगदिश सिध्द | :कमिटीमध्ये दोन सदस्य ठेवण्यात यावे. |
| श्री.मधुकर सावंत | :किती कोटींचे कामे झाली याचेशी काही देणेघेणे नाही. जे केले ते बरोबर आहे की, नाही. त्याची आवश्यकता होती की, नाही. |
| श्री.अ.साजेद अ.सत्तार | :100 कोटींचे कामे झालेली आहेत हे नमुद करण्यात यावे. |
| श्री.रेणुकादास वैद्य | :अधिकारी यांनी सांगावे. |
| श्री.नासेर खान | :तत्कालिन मुख्यलेखाधिकारी गेलेतर मनपा बंद झाली का? त्यांनी काय केले ते औरंगाबाद शहराला माहीती आहे. |
| श्री.मधुकर सावंत | :मनपाचे हित जोपसण्यासाठी उभा राहीलेलो आहे. वैयक्तिक आरोप कुणावर करायचे नाही. |
| श्री.अ.साजेद अ.सत्तार | :तत्कालिन मुख्यलेखाधिकारी यांनी स्वत:च्या अधिकारात आयुक्तांची सही न घेता कोटींची खरेदी केलेली आहे. त्याची चौकशी झालेली आहे. आरोपपत्र झालेले आहे. चौकशी पेंडींग आहे. |
| मा.सभापती | :स.सदस्यांनी 5 (2) (2) आणि 67 (3) (क) चा विषय उपस्थित केला या संदर्भांत मा.मुख्यलेखापरिक्षक श्री.जाधव यांनी सविस्तर अहवाल तयार करून संबधीत पदाधिकारी यांना दिलेला आहे. काल परवाच्या वर्तमानपत्रात काही प्रमाणात छापुन आलेले आहे. त्यासाठी 5 (2) (2) साठी विशेष आणि 67 (3) क साठी विशेष दोन वेगवेगळया मिटींग आयोजित करण्यात येईल. मुख्य लेखापरिक्षक यांचे कमिटीमध्ये मा.सदस्य श्री.मधुकर सावंत श्री.जगदिश सिध्द, श्री.रेणुकादास वैद्य,श्री.नासेर खान,श्री.जुबेर गाझी,श्री.महेश माळवतकर, श्री.निमगांवकर यांची समिती स्थापन करून जी कामे झालीत ती 5 (2) (2) मध्ये करता येतात का? त्या जागेवर झालीत का. त्या प्रमाणात झालीत का याची सविस्तर चौकशी 15 दिवसांच्या आत करून त्या करीता विशेष मिटींग आयोजित करण्यात येइल आणि त्या मिटींगमध्ये त्याचा खुलासा आणि संबधीत अधिकारी यांचेवर जबाबदारी निश्चित करण्यात यावी. चौकशी समितीमध्ये सभापती असणार आहे. शहर अभियंता राहतील. |

याच बरोबर राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा.सभापती यांनी घोषित केले.

**नगर सचिव**
महानगरपालिका औरंगाबाद